# अर्थबोध पत्रिका

अंक - ५ सप्टेंबर १९९९

महत्वाच्या आर्थिक, राजकीय, व सामाजिक
विषयावरील माहिती सर्वांपर्यंत पोचवणारे माध्यम

---

## प्राथमिक शिक्षण

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

(केवळ खाजगी वितरणासाठी)

## अर्थबोध पत्रिकेविषयी ...

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेतर्फे "अर्थबोध पत्रिका" हे आर्थिक, सामाजिक, व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन, नोव्हेंबर १९९८ पासून प्रकाशित करण्यात येत आहे. सर्वसामान्य मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे, एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे मांडणे, तसेच विविध समस्यांच्या संदर्भातील सैद्धांतिक व संकल्पनात्मक बाबी सोप्या शब्दांत देणे, हे या पत्रिकेचे उद्देश आहेत.

स्वतंत्र लेखनाबरोबरच, संकलित लेखनही अर्थबोध पत्रिकेतून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. विशेषतः अनेक विषयांवरील सखोल माहिती व सैद्धांतिक बैठक असणारे विश्लेषणात्मक लेख छापणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके व पुस्तके आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशा माहिती व विश्लेषणाच्या आधारे लिहिलेल्या लेखांचा 'पत्रिके'त समावेश असेल.

अर्थबोध पत्रिकेचा हा पाचवा अंक आहे, नियोजित अंकांपैकी या वर्षीचा शेवटचा म्हणजे सहावा अंक डिसेंबर ९९ पर्यंत प्रसिद्ध होईल. जानेवारी २००० पासून अर्थबोध पत्रिकेचे दुसरे वर्ष सुरू होईल.

आम्हाला आजपर्यंत वाचकांचा व वेगवेगळ्या संपर्क माध्यमांचा मिळालेला प्रतिसाद पाहून, पुढील वर्षात जमल्यास सहाऐवजी बारा अंक काढावेत असाही संस्थेचा मानस आहे. पुढील वर्षापासून अर्थबोधपत्रिका विनामूल्य नसेल, पण त्याचे अगदी नाममात्र इतके म्हणजे, सहा अंकांना पन्नास रुपये, याप्रमाणे देणगीमूल्य आकारले जाईल.

**अर्थबोध पत्रिका अंक** : ५ सप्टेंबर १९९९

**संपादक** : रमेश पानसे - **संपादन सहाय्यक** : राज्यश्री क्षीरसागर

**प्रकाशक** : भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६.

**मुद्रक** : एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०.

**पत्रव्यवहारासाठी पत्ता** : संपादक, अर्थबोधपत्रिका, 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६.

# अर्थबोध पत्रिका

अंक - ५ सप्टेंबर १९९९

महत्वाच्या आर्थिक, राजकीय, व सामाजिक
विषयावरील माहिती सर्वापर्यंत पोचवणारे माध्यम

---

## प्राथमिक शिक्षण

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**
'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट रोड, पुणे ४११ ०१६.
फोन : ५६५७१३२ / ५६५७२१०

(केवळ खाजगी वितरणासाठी)

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय | १ |
| २. | प्राथमिक शिक्षणाचा शोध घेताना . . . | ४ |
| ३. | शाळा, शिक्षण आणि पालक | १० |
| ४. | शाळेतील वातावरण | १६ |
| ५. | वर्गात नेमके काय घडते? | २१ |
| ६. | शिक्षकांना काय वाटते? | २५ |
| ७. | सुधारणेच्या दिशेने | ३१ |
| ८. | सरतेशेवटी . . . | ३७ |
| ९. | परिशिष्ट | ३९ |


---

**सूचना** -

● या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संस्थेच्या पत्यावर पाठवावेत अशी आपणास विनंती आहे.

● अंकातील मजकूर आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रांत प्रसिद्ध करू शकता. फक्त लेख संपल्यावर 'अर्थबोधपत्रिका - भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी च्या सौजन्याने' अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.

● लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे कोणतेही मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला पाठवावा ही अपेक्षा आहे.

# वाचक काय म्हणतात?

- उद्बोधक माहिती असलेला ज्ञानवर्धक अंक
- मार्गदर्शक अंक
- विद्यार्थ्यांमध्ये जाणीव निर्माण करणारा अंक
- अभ्यासाव्यतिरिक्त इतर माहिती पुरविणारा दर्जेदार अंक
- आर्थिक व इतर कठीण विषय सोप्या शब्दांत मांडणारा अंक
- अभ्यासपूर्ण लेख असणारा अंक
- वाचनीय व संग्राह्य अंक
- ग्रामीण भागांत असे विषय पोचविण्याची गरज भागविणारा अंक
- समाज प्रबोधन करणारा अंक
- बुद्धिवादी वाचकांना आवडेल असा अंक
- जनजागृतीचे कार्य करणारा अंक
- स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शक अंक

# संपादकीय

आधुनिक काळात, आणि विशेषतः आजच्या माहिती व तंत्रज्ञान विस्ताराच्या युगात, पायाभूत प्राथमिक शिक्षणाला कळीचे स्थान आहे. देशातील प्रत्येक व्यक्ती निदान प्राथमिक शिक्षणाने संपन्न असणे ही बाब त्या त्या व्यक्तीच्या तसेच एकूण राष्ट्राच्या बाबतीत महत्त्वाची आहे. व्यक्तीला वैयक्तिक आणि सामाजिक आयुष्य समृद्धतेने जगण्यासाठी जसे शिक्षण आवश्यक आहे तसेच एक सजग नि जबाबदार नागरिक म्हणून आणि मानवी साधनसंपत्तीचा एक अंश म्हणून सुशिक्षित मनुष्य, ही राष्ट्राचा आधार आहे. ज्या राष्ट्रात साक्षरतेचे प्रमाण अल्प आहे असे राष्ट्र प्रगत होऊ शकत नाही. कारण आज असे कोणतेही प्रगत राष्ट्र आढळणार नाही की जेथे साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे बहुतेक राष्ट्रांमधून किमान प्राथमिक शिक्षण तरी सार्वत्रिक व्हावे असे प्रयत्न व कायदे केलेले आढळतात.

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा आग्रह आज भारतातही समाजातील अनेक थरांतून केला जात आहे. जुलै १९९७ मध्ये यासाठी ८३ वी घटनादुरुस्ती राज्यसभेत सुचविण्यात आली आहे. प्राथमिक शिक्षण सक्तीचे नि मोफत केले जावे असा अभिप्राय अलीकडेच सर्वोच्च न्यायालयानेही दिला आहे. अशा तऱ्हेचा कायदा आज ना उद्या लवकरच अंमलात येईल अशी आशा आहे. परंतु कायदा झाला तरी त्याच्या अंमलबजावणीच्या संदर्भात अनेक अडचणी आजच नजरेसमोर येत आहेत, आणि त्यांच्या निराकरणाचीही तरतूद कायद्याच्या अनुषंगाने करावी लागणार आहे.

अर्थात प्राथमिक शिक्षण सक्तीचे नि मोफत करून प्रश्न संपणार नाहीत. म्हणजेच जेथे जेथे शाळा नसतील तेथे तेथे शाळा उघडून आणि मुलांना तेथे नोंदवून प्रश्न संपत नाहीत. शाळांचा भौतिक नि शैक्षणिक दर्जा काय आहे यावर मुलांच्या शिक्षणाची पूर्ती अवलंबून आहे.

आजपर्यंत, मुले शाळेत का जात नाहीत याची कारणे, 'शाळे'बाहेर म्हणजे मुलांच्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमीत शोधण्याचा प्रयत्न बराच झाला. परंतु तेवढीच महत्त्वाची कारणे, शाळेच्या आत डोकावल्यास आढळतात हे प्रकर्षाने दाखवून दिले आहे ते अलीकडच्या एका अभ्यासाने. 'दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' आणि 'इंडियन सोशल इन्स्टिट्यूट' या दिल्लीतील दोन संस्थांमधील संशोधकांनी बिहार, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आणि

राजस्थान या उत्तर भारतातील चार राज्यांमधील १८८ खेड्यांची नमुना पाहणी केली. या पाहणीचा सविस्तर अहवाल 'पब्लिक रिपोर्ट ऑन बेसिक एज्युकेशन इन इंडिया' या नावाने १९९९ सालच्या सुरुवातीस प्रसिद्ध झाला आहे.

या अहवालाने भारतातील खेड्या-पाड्यांतील प्राथमिक शिक्षणाच्या असलेल्या सोयींबाबतची दारूण स्थिती, केवळ एक सत्यस्थिती म्हणून मांडून जागरूक समाजाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले आहे. देशाच्या काही राज्यांतली दाखवून दिलेली ही परिस्थिती सर्वांनाच आपापल्या राज्यांत, तेथील खेड्या-पाड्यांत पडताळून पाहता येईल.

आपल्या देशाला प्राथमिक शिक्षणाचा जसा बऱ्यापैकी दीर्घ इतिहास आहे त्याचप्रमाणे अनेक समाजधुरिणांनी त्याच्या सार्वत्रिकीकरणासाठी आग्रह धरल्याचा इतिहास शतकभराहून मोठा आहे. स्वातंत्र्योत्तर अर्धशतकाचाही अवधी आता लोटलेला आहे. या एवढ्या मोठ्या कालावधीतही प्राथमिक शिक्षणाची सुयोग्य नि दर्जेदार व्यवस्था निर्माण का होऊ शकली नाही हा खरं तर विचार करायला लावणारा प्रश्न आहे. प्रोब अहवालाने परिस्थिती अगदी सूक्ष्मतेने उघड करून दाखविली आहे. आणि त्याची स्थानिक पातळीपासून ते राष्ट्रीय पातळीपर्यंत कुठे कुठे कारणे दडलेली आहेत हे शोधून त्यावर उपाय करण्याचे आव्हानात्मक कार्य आपल्यापुढे ठेवले आहे.

येथे सविस्तर चर्चा करणे शक्य नसले तरी ज्यांना देशातील सर्वसामान्य परिस्थितीचे भान आहे, अशांच्या नजरेसमोर ठळकपणे येणारी उपर्युक्त परिस्थितीची काही मूलभूत कारणे येथे नोंदवता येतील.

पहिले म्हणजे, धोरणकर्त्या वर्गाला म्हणजे राजकीय आणि शासकीय पातळीवरील संबंधितांना प्राथमिक शिक्षण हे कधीच आव्हानाचे नि आपुलकीचे क्षेत्र वाटलेले नाही. खास रस घेऊन या क्षेत्रात काही परिवर्तन घडविण्यापेक्षाही नाईलाज म्हणून किमान काही घडविण्याचाच प्रयत्न येथे झाला. दुसरे असे की, शिक्षणाशी नि विशेषतः प्राथमिक शिक्षणाशी संबंधित असणारी शासकीय यंत्रणा फारच कोरडेपणाने आणि नियमांचे किनारे सांभाळत, काम करताना आढळते. शिक्षणाच्या आशयापेक्षा शिक्षणाच्या कागदोपत्री नोंदींवरच त्यांचे लक्ष केंद्रित झालेले आढळते. तिसरी गोष्ट, अशा खेड्या-पाड्यांतील प्राथमिक शाळा ही शासनाची मक्तेदारी झाल्यामुळे, गावस्तरावरील जनतेला त्यात कोठेही उतरायला संधी वा वाव नसतो. शाळा 'गावात' असते पण ती 'गावाची' नसते, त्यामुळे शाळांच्या जवळ असणारा आणि रोज शाळांकडे पाहणारा समाजही त्यांच्या परिस्थितीबाबत उदासीन असतो. यामुळेच किंबहुना आणखी एक प्रश्न निर्माण

होतो; तो म्हणजे शालाकार्याच्या विविध स्तरांवरील अनैतिक वागणुकीचा किंवा उघडउघड भ्रष्टाचाराचा.

अशा प्रश्नांना छेद द्यायचा असेल तर, या देशातील जागरूक लोकांना, फार मोठे सामाजिक आंदोलनच छेडावे लागेल. अशा दिशेने विचार करू पाहणारांना असमाधानकारक शैक्षणिक परिस्थितीची स्फोटकं ऊर्जा या प्रोब अहवालात जरूर प्राप्त होईल.


भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने, या करताच, या अहवालाचे संक्षिप्त सार अर्थबोधपत्रिकेच्या वाचकांना सादर करण्याचा निर्णय घेतला.

मराठी वाचकांना, प्रोब अहवाल वाचत असतानाच, महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणविषयक काय परिस्थिती आहे, हे जाणून घेण्याची उत्सुकता वाटेल. प्रत्यक्षात, ज्या प्रकारचा अभ्यास प्रोब अभ्यासकांनी केला त्या प्रकारचा अभ्यास आपल्याकडे कोणी केल्याचे दिसत नाही. उत्तर भारतातील राज्यांपेक्षा महाराष्ट्रातील खेड्यांतील शिक्षणाची अवस्था काही फारशी वेगळी असेल असे वाटत नाही. तरीही, महाराष्ट्राला या संदर्भात थोडासा आशादायक सूर काढायला हरकत नाही.

एक म्हणजे, महाराष्ट्रातील आजच्या घडीला असलेली साक्षरतेची परिस्थिती सांगणारी आकडेवारी प्रोब अभ्यासातील राज्यांपेक्षा बरीच उजवी आहे. (परिशिष्ट १) दुसरे, म्हणजे, शाळांतर्गत प्रत्यक्ष शिक्षण कसे असावे यांविषयी विविध प्रयोग करणाऱ्या अनेक शाळा आणि तत्संबंधी विचार मांडणारे त्यांचे प्रवर्तक शिक्षणतज्ज्ञ उद्याच्या महाराष्ट्रविषयी काही आशादायक चित्र निर्माण करीत आहेत, ही वस्तुस्थिती आहे. (परिशिष्ट २) तिसरे असे की, युनिसेफ आणि त्यांच्याशी संबंधित अशा संस्था, महाराष्ट्रातील मागास खेड्यांमध्ये ज्या शिक्षणविषयक विविध योजना राबवीत आहेत, त्यांच्या अंमलबजावणीचे चित्र बऱ्यापैकी प्रभाव पाडीत आहे. (परिशिष्ट ३) त्यामुळे अर्थातच हरखून जाण्याचे काहीच कारण नाही, कारण अजूनही मुलांच्या आनंददायी सार्वत्रिक शिक्षणापासून आपण अनेक योजने दूरच आहोत. आशादायक बदलांच्या वाटेवर आपण काही पावले टाकू लागलो आहोत इतकेच !!

■■

# प्राथमिक शिक्षणाचा शोध घेताना . . .



शिक्षणाचा मूलभूत हक्कात समावेश करावा किंवा प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे की नाही याबाबत मतमतांतरे आहेत. ही मतेमतांतरे बाजूला ठेवून शिक्षणाबाबतची नेमकी स्थिती जाणून घेणे महत्त्वाचे आहे. यासंदर्भात १९९१ च्या जनगणनेनुसार असलेली वस्तुस्थिती पुढील प्रमाणे आहे.

● देशातील निम्मी जनता अद्याप निरक्षर आहे व त्यांना अजिबात लिहिता वाचता येत नाही. ६१ टक्के महिलांचा व ३६ टक्के पुरूषांचा त्यात समावेश आहे.

● शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या प्रौढांची संख्या ३० टक्क्यांहून कमी आहे. सर्वसाधारण भारतीय नागरिकाने शालेय शिक्षणाची किमान ८ वर्षे पूर्ण करावीत, असे भारताच्या घटनेत अपेक्षित आहे. पण आपल्या देशातील बहुसंख्य पुरूषांनी शालेय शिक्षणाची सरासरी सुमारे ३ वर्षे व स्त्रियांनी सुमारे २ वर्षे पूर्ण केली आहेत असे ह्युमन डेव्हलपमेंट रिपोर्ट (१९९४) वरून स्पष्ट होते.

● भारतातील ६ ते १४ या वयोगटातील एक तृतीयांश मुले शाळेबाहेर आहेत. यात सुमारे २३ लाख मुले व ३६ लाख मुलींचा समावेश आहे. शिक्षणाबाबतची ही आकडेवारी अतिशय विदारक आहे. एवढ्या मोठ्या लोकशाही राष्ट्रात स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे झाली तरी निम्यापेक्षा जास्त लोकांची शिक्षण या मूलभूत गरजेचीही पूर्तता होऊ शकली नाही ही वस्तुस्थिती खेदजनक आहे.

● भारतात शिक्षणाची टक्केवारी कमी आहेच शिवाय यात फार विषमता आहे. केरळ किंवा महाराष्ट्रात शिक्षितांचे जेवढे प्रमाण आहे, तेवढेच बिहार, राजस्थान, उत्तर प्रदेश येथील पुरुष आणि विशेषतः स्त्रियांच्या अशिक्षिततेचे प्रमाण आहे. मागासवर्गीय आणि अनुसूचित जातीजमातीपर्यंत तर शिक्षण फारसे पोहचलेलेच नाही. बिहार, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश व राजस्थान या चार राज्यांतील ७२ जिल्ह्यांमधील १० ते १४ वयोगटातील बहुसंख्य मुले अशिक्षित आहेत, ही आणखी एक धक्कादायक बाब आहे.

● भारतातील शिक्षितांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे हे आपण आपल्या आजूबाजूला नजर टाकली तर जाणवेल, पण ही प्रगती अतिशय मंदगतीने होत आहे. भारतात लोकसंख्यावाढीचा प्रश्न बिकट असल्याने शिक्षितांबरोबर अशिक्षितांची संख्याही वाढत आहे ही वस्तुस्थिती लक्षात घेतली

पाहिजे. १९९१ मध्ये अशिक्षितांची संख्या ३७.१ कोटी होती. त्यापूर्वी १९८१ मध्ये ती ३५ कोटी व १९७१ मध्ये ३०.७ कोटी एवढी होती.

देशातील सर्वसामान्य शिक्षणाबाबतचे चित्र आपल्या डोळ्यापुढे उभे राहिल्यानंतर आपण आता केवळ प्राथमिक शिक्षणावर लक्ष केंद्रित करणार आहोत. प्राथमिक शिक्षणापासून समाज, विशेषतः मुले, वंचित का राहिली याची काही कारणे नेहमी सांगण्यात येतात. 'प्रोब' (PROBE - Public Report on Basic Education in India.) गटाने या कारणांचा अभ्यास केला. त्याबाबत सर्वेक्षण केले. या कारणांची माहिती पुढे दिली आहे.

**१) पाल्यांना शिकविण्यात पालकांनाच रस नसतो.**

मुलांच्या शिक्षणाबद्दल पालकांमध्येच औदासिन्य असले तर शासन तरी काय करणार? असा प्रश्न शासनाशी संबंधित आधिकारी नेहमीच उपस्थित करीत असतात. याबाबत राष्ट्रीय पातळीवरील मोठमोठ्या वृत्तपत्रातील प्रतिष्ठित तज्ज्ञांच्या लेखांतही पालकांवरच दोषारोप करण्यात येतो, असे आढळले आहे.[१]

तथापि, प्रोब गटाने निवडलेल्या राज्यांत नेमके याच्या उलट चित्र आढळले. शिक्षणाच्या क्षेत्रात ही राज्ये मागासलेली समजली जातात. म्हणजेच या राज्यांत इतर राज्यांच्या तुलनेने पालकांचे औदासिन्य फारच जास्त आहे, असे समजले जाते. पण आश्चर्य म्हणजे या राज्यामधील ९८ टक्के पालकांनी मुलगे शिक्षित असली पाहिजेत तर ८९ टक्के पालकांनी मुलगे व मुली दोघेही शिक्षित असले पाहिजेत असे मत व्यक्त केले आहे. सर्व मुलांसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे का? या प्रश्नाला ८० टक्के पालकांनी होकारार्थी उत्तर दिले आहे.

मुलांना आणि मुलींना शिक्षण का द्यावे? या प्रश्नातून पुढे आलेली उत्तरे अशी -

| मुलांना शिक्षणामुळे होणारे फायदे | पर्यायाला होकार देणाऱ्या पालकांची टक्केवारी |
|---|---|
| (१) नोकरी व मिळकत (उत्पन्न) वाढण्याच्या संधी मिळतात | ८७% |
| (२) सामाजिक प्रतिष्ठा वाढते | २९% |

१. 'टाइम्स ऑफ इंडिया' - १५ ऑगस्ट १९९७ 'इंडियन एक्सप्रेस' - १५ ऑगस्ट १९९७.

(3) आत्मविश्वास आणि आत्मप्रतिष्ठा
(self esteem) वाढते २४%

<u>मुलींना शिक्षणामुळे होणारे फायदे</u>

(१) पत्र लिहिणे, हिशोब ठेवणे व इतर
कामे करणे सोपे जाते ५०%

(२) नोकरी व मिळकत (उत्पन्न)
वाढण्याच्या संधी मिळतात. ४०%

(३) लग्न ठरणे सोपे जाते. ३५%

याच मुद्याचे सविस्तर विश्लेषण शाळा, शिक्षण व पालक या उपविषयात पुढे केले आहे.

**२) शिक्षणातील एक मोठा अडसर म्हणजे 'बालमजुरी' हा आहे.**

अनेक मुलांना लहान वयातच कष्ट करून उपजीविकेसाठी पैसे मिळवावे लागतात. त्यामुळे त्यांना शिक्षणासाठी, शाळेसाठी वेळच मिळत नाही. भारतातील अशा बालकामगारांची संख्या ६५ लाखावर आहे, अशी विधाने प्रसार माध्यमातून किंवा काही संघटनांव्दारे प्रसृत होत असतात. पण बहुतेक वेळा यात अतिशयोक्ती असते असे प्रोब गटाला आढळले आहे.

काचेच्या कारखान्यात, गालिचे तयार करण्याच्या कामात, फटाके निर्मितीच्या उद्योगात किंवा हॉटेल उद्योगात बहुसंख्य बालकामगार आहेत व त्यांना दिवसाला दहा-बारा तास काम करावे लागते असे म्हटले जाते. बालकामगारांच्या संख्येबाबत व ते करीत असलेल्या प्रत्यक्ष कामाच्या तासांबाबत अतिशयोक्ती असली तरी हा प्रश्न नाहीच असे म्हणता येत नाही. मात्र बालकामगार व शालेय शिक्षण यांचा विचार करता ही विधाने तीन प्रकारे दिशाभूल करणारी आहेत, असे प्रोबने म्हटले आहे. १. प्रश्नाच्या व्याप्तीबाबत अतिशयोक्ती. पूर्णवेळ बालकामगार असणाऱ्यांची संख्या फारच कमी आहे. दिवसाला तीन ते चार तास काम करून शाळेत जाण्याइतका वेळ बऱ्याच मुलांजवळ असतो. २. हे बालकामगार बहुतांश वेळा घरात, शेतात किंवा इतर छोट्या मोठ्या कामात गुंतलेले असतात. मजुरीवर काम करणाऱ्या बालकामगारांची संख्या कमीच आहे. त्यामुळे कामाच्या वेळा सांभाळून शाळेत जाणे हे त्यांना जमू शकते. ३. बालकामगारांना काम असतं म्हणून ते शाळेत जात नाहीत, यापेक्षा त्यांनी इतर काही कारणांनी शाळा सोडली असते म्हणून ते काम करतात, ही वस्तुस्थिती आहे.

५ ते १४ या वयोगटातील बालकामगारांची संख्या प्रोबला अशी आढळली.

| | मुली | मुले |
|---|---|---|
| भारताची जनगणना १९९१ | ८.८% | १०% |
| राष्ट्रीय नमुना पाहणी १९९३ | ७.८% | ६.९% |
| एन.सी.ए.ई.आर[2] सर्वेक्षण १९९४ | ३.५% | ४.४% |

आता या बालकामगारांचा नेमका किती वेळ प्रत्यक्ष काम करण्यावर खर्च होतो हे खालील आकडेवारीवरून स्पष्ट होईल.

| | मुले | मुली |
|---|---|---|
| १) आठ तासांपेक्षा जास्त वेळ काम | २०% | २२% |
| २) मजुरीवर काम करणे | ५% | १% |
| ३) रोजच्या कामाचे सरासरी तास | ४.२ तास | ५.१ तास |
| ४) शाळेत जाणाऱ्या मुलांच्या तुलनेत कामाचे जास्त होणारे तास | २.१ तास | २.२ तास |

भारतात बालकामगारांचा प्रश्नच नाही असा याचा अर्थ नाही. गरिबीमुळे, शेतीच्या कामासाठी किंवा घरकामासाठी शिक्षण सोडणाऱ्या बालकामगारांची संख्या दुर्लक्षून चालणार नाही.

### ३) प्राथमिक शिक्षण विनामूल्य आहे.

सरकारी शाळेतील प्रवेश शुल्क किंवा शैक्षणिक शुल्क नाममात्र असले तरी पाल्याच्या शैक्षणिक साहित्यावर, गणवेशावर व इतर प्रासंगिक खर्च पालकांना करावा लागतो. गरीब कुटुंबांना विशेष करुन जिथे तीन-चार मुले असतात तिथे पालकांना एवढा खर्च करणे शक्य होत नाही. त्यामुळे केवळ 'फी-माफी' म्हणजे 'शिक्षण विनामूल्य' असा अर्थ होत नाही. पालकांच्या आर्थिक परिस्थितीबाबतच्या चर्चेत याबाबतची आकडेवारी देण्यात आली आहे.

### ४) सर्वत्र सरकारी शाळा उपलब्ध असतात.

स्वातंत्र्यानंतर सरकारी शाळांच्या संख्येत निश्चितपणे वाढ झाली. शिक्षणाबद्दलची जागरूकता वाढली. पण तरीही या शाळांमध्ये आपल्या मुलामुलींना पाठविणे खेड्यांतील पालकांना जमले नाही, अर्थात याची कारणेही आहेत. एक म्हणजे शाळा घरापासून किती किलोमीटर्स अंतरावर आहेत व ते

---

२. नॅशनल कौन्सिल ऑफ अ‍ॅप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च (१९९६ - एप्रिल)

अंतर चालत जाण्याइतके आहे किंवा कसे हे तर पालकांना बघावेच लागते. हे अंतर जरी पार केले तरी एक प्रकारचे 'सामाजिक अंतर' सतत पालकांच्या मनात असते. खेड्यात किंवा छोट्या गावात जातीभेद व त्या त्या समाजातील घटकातील रूढी, परंपरा यांना फार महत्त्व असते. त्यामुळे शाळा दुसऱ्या जातीच्या लोकांच्या वस्तीत असली तरी पालक पाल्यांना शाळेत पाठविण्यास धजावत नाहीत. मुलींच्या बाबतीत तर हा प्रश्न आणखीनच मोठा ठरतो.

एन.सी.इ.आर.टी. च्या सर्वेक्षणानुसार (१९९३) ग्रामीण भागात १ किलोमीटर्स अंतरावर शाळांची सोय आहे अशी ९४ टक्के गावे आहेत. तर ५७ टक्के गावात माध्यमिक शाळाही आहेत असे आढळले आहे. प्रोबने सर्वेक्षण केलेल्या गावांमध्ये हेच प्रमाण ९२ टक्के व ४९ टक्के असे आहे.

दुसरे असे की शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करताना ६ ते १४ वयोगटातील मुलामुलींना शिक्षण मिळाले पाहिजे असे म्हटले गेले आहे. त्यामुळे या छोट्या गावात व खेड्यांमध्ये माध्यमिक शाळाही असायला हव्यात. प्रोब गटाला असे आढळले आहे की केवळ २९ टक्के खेड्यातच माध्यमिक शाळा आहेत आणि त्या देखील किमान दीड दोन किलोमीटर्स अंतरावर. तिसरे म्हणजे, घर व शाळा यांतील अंतर शहरात रिक्षा-बसने पार करणे सोपे आहे. पण खेड्यामध्ये जंगलांमधून, नदी पार करून किंवा डोंगर चढून-उतरून लहान मुलांची ने-आण करणे पालकांना शक्य होत नाही. थंडी, ऊन, पाऊस यापासून बचाव करीत शाळेत जाणे हे खरोखरीच महादिव्य ठरते.

### ५) गळती / अनुपस्थिती

पालकांची व शिक्षकांची तसेच विद्यार्थ्यांची आणखी एक मोठी अडचण असते ती म्हणजे शाळेतील नियमित उपस्थितीची. अनेकदा शेतीच्या कामासाठी, लहान भावंडांना सांभाळण्यासाठी, कधी कुणाच्या आजारपणासाठी त्यातल्या त्यात मोठ्या मुलाला किंवा मुलीला घरी थांबावे लागते. त्यामुळे ज्यांची शाळा बुडते त्यांना बुडलेला अभ्यास भरून काढणे अनेकदा शक्य होत नाही. अशा परिस्थितीत विविध कारणांमुळे पालक शिक्षकांशी संपर्क साधू शकत नाहीत. अंतिमतः त्या मुलांची शाळा बंद, असेच चित्र दिसते.

शाळेतील मुलांच्या गळतीची कारणे अनेक असतात. या कारणांमुळेच मुलांची शाळा बुडत असली आणि त्यामुळे शाळा बंद होऊ नये, असे पालकांचे

*सर्वांना प्राथमिक शिक्षण मिळणे हे सामाजिक न्यायासाठी, समतेसाठी अतिशय महत्त्वाचे पाऊल आहे.*


व शिक्षकांचे मत असले तरी प्रत्यक्षात त्याचा परिणाम शाळा बंद होण्यावरच होतो. यासंदर्भातील नेमकी आकडेवारी प्रोबला उपलब्ध होऊ शकली नाही. पण शाळेबाहेर असलेली मुले वेळ कसा घालवतात याचा त्यांनी अभ्यास केला. त्यानुसार त्यांनी खालीलप्रमाणे त्याचे वर्गीकरण केले. यात प्रत्येक कामामागे दिवसातील किती टक्के वेळ खर्च होतो ती आकडेवारी त्यांनी दिली आहे.

| **कारणे** | **मुले** | **मुली** |
|---|---|---|
| १) लहान भावंडांना सांभाळणे | ३.५% | १२% |
| २) घरगुती काम | ८.२% | १९.३% |
| ३) शेतीचे काम | १३.६% | ८% |
| ४) मजूरीचे काम | १.७% | ०.५% |
| ५) इतर काम | ७.६% | २.८% |
| ६) मोकळा वेळ | ६५.४% | ५७.४% |

या सर्व विवेचनावरून एक महत्त्वाची गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे शिक्षण हा केवळ 'शैक्षणिक प्रश्न' नाही. ह्याच्या आर्थिक, सामाजिक बाजूही महत्त्वाच्या आहेत.

■■

# शाळा, शिक्षण आणि पालक



मुलांना शिकविण्याची जबाबदारी पालकांची आहे असा सर्वमान्य समज आहे, किंबहुना मुले शिकली नाहीत पालकांनाचदोषी ठरविण्यात येतं. अनेकदा यासंदर्भात शाळा, विद्यार्थी व पालक यांच्याकडेच बोट दाखविण्यात येतं. पण या पालकांच्या नेमक्या अडचणी कोणत्या? त्यांचे शाळांबद्दल, शिक्षकांबद्दल किंवा अभ्यासक्रमाबाबत काय म्हणणे आहे, हे प्रोबने जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. या पालकांची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन हा अभ्यास करण्यात आला आहे. प्रश्नाच्या मुळाशी जाण्याच्या या प्रयत्नातून एक वेगळा दृष्टिकोण पुढे येतो.

'मध्यमवर्गीय मूलं शाळेत जातं व शिक्षण पूर्ण करते, ह्यामागे त्याला उपलब्ध असलेल्या सुरक्षित वातावरणाचे, पालकांच्या सहकार्याचे, व पैशाचे पाठबळ असते. याशिवाय त्यांच्या पालकांना शाळेच्या व्यवस्थापनाशी, शिक्षकांशी व सरकारी यंत्रणेशी कसे वागायचे याची पण जाण असते. नेमकी या उलट गरीब वस्तीतल्या मुलामुलींची व पालकांची परिस्थिती असते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षण पूर्ण करावे यासाठी त्या विद्यार्थ्यांना, त्यांच्या पालकांना तसेच वेळप्रसंगी त्यांच्या शिक्षकांना बरेच प्रयत्न करावे लागतात. प्रोबच्या सर्वेक्षणात दिलेली राजस्थानातील भरतपूर जिल्ह्यातील एका खेड्यातील एक घटना यादृष्टीने बोलकी ठरेल. अन्वर हुसेन हा प्राथमिक शाळेतील विद्यार्थी. आई-वडिल अशिक्षित असूनही मुलाने शिकून मोठे व्हावे ही त्यांची आंतरिक इच्छा, त्यांची आर्थिक परिस्थिती बेताचीच असली तरी स्वतःची थोडी जमीन असल्याने उदरनिर्वाहाचा प्रश्न नव्हता. शाळेत नेमके काय शिकवितात हेच त्याला कळत नव्हते. शाळेतील शिक्षक त्याला कायम रागवत असत. आई-वडिलांना त्याच्या शाळेतील अभ्यास समजत नसे. ते केवळ त्याला शाळेत जाण्याबद्दल समजावून सांगत असत. इयत्ता चौथी नंतर अन्वरने शाळेचे शिक्षण सोडले. सध्या तो गुरे चरायला नेतो व उरलेला वेळ खेळणे, उनाडक्या करणे यात घालवतो. यावरून कौटुंबिक वातावरण, पालक, विद्यार्थी, शालेय अभ्यासक्रम व वातावरण, शाळा आणि शिक्षक यांच्यातील परस्परसंबंध व सौहार्द्रपूर्ण नाते किती महत्त्वाचे आहे हे जाणवते.

*शिक्षण व आरोग्य, शिक्षण व सामाजिक व्यक्तिमत्त्व, शिक्षण व राहणीमान या सर्वांना असलेला परस्परसंबंध अतिशय महत्त्वाचा आहे.*

'पालकांचे शिक्षणाबद्दलचे विचार' यासंदर्भात प्रोबने केलेल्या सर्वेक्षणातून अनेक मुद्दे पुढे आले.

● मुलामुलींना शिक्षण मिळणे महत्त्वाचे आहे असे बहुतांश पालकांना वाटते. मुलग्यांना शिक्षण हवेच असे ९८% पालकांचे म्हणणे आहे तर मुलांबरोबर मुलींसाठीही शिक्षण तेवढेच महत्त्वाचे आहे असे ८९% पालकांचे मत आहे. 'जे शिकत नाहीत त्यांचे सर्वप्रकारे नुकसानच होते', 'अशिक्षित व्यक्ती आणि जनावरे यांच्यात काय फरक', 'घरात एक व्यक्ति जरी शिक्षित असेल तरी त्या कुटुंबाची अडचण होत नाही.' अशा प्रकारची मते या पालकांनी व्यक्त केली आहेत.

● पाल्यांना शिक्षण मिळावे यासाठी जे पालक उत्सुक असतात ते घराजवळ सरकारी शाळा नसेल तर खाजगी शाळेत पाठवितात. त्यामुळे ग्रामीण भागातही छोट्या छोट्या खाजगी शाळा आता आढळत आहेत. खेडेगावातील छोट्या छोट्या गटांनी मागणी किंवा विनंती केल्यास तिथे सरकारतर्फे शाळा सुरू करण्यात येईल, अशी घोषणा मध्यप्रदेशातील शासनाने केल्यावर एका वर्षात त्यांच्याकडे सुमारे पंधरा हजारावर विनंती अर्ज आले यावरून शिक्षणासाठी ग्रामीण भागातील नागरिक-पालकांची मानसिकता हळूहळू तयार होत आहे किंवा झाली आहे असे स्पष्ट होते.

ही बदललेली मानसिकताच प्रोब सर्वेक्षणातून मिळालेली राज्यनिहाय टक्केवारी दर्शविते.

| राज्य | मुलांना शिकविले पाहिजे (पालकांच्या होकारार्थी उत्तराची टक्केवारी) | मुलींनाही शिकविले पाहिजे (पालकांच्या होकारार्थी उत्तराची टक्केवारी) |
|---|---|---|
| उत्तर प्रदेश | १००% | ९२% |
| बिहार | ९९% | ८८% |
| राजस्थान | ९९% | ८५% |
| मध्यप्रदेश | १००% | ९३% |

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की ९९ टक्के पुरूषांनी मुलांना शिक्षण आवश्यक आहे व ९१ टक्के पुरूषांनी मुलींनाही शिक्षण आवश्यक आहे असे मत व्यक्त केले. ९९% अशिक्षित पालकांनी मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले तर ८४% अशिक्षित पालकांनी मुलींच्याही शिक्षणाला महत्त्व दिले. सुशिक्षित पालकांमधील हीच टक्केवारी १००% व ९५% अशी आहे.

प्रोबच्या या सर्वेक्षणात, मोलमजुरीची कामे (कॅज्युअल लेबर्स) करणाऱ्यांपैकी ९९ टक्के स्त्री-पुरूषांनी मुलांसाठी शिक्षण ही आवश्यक गोष्ट आहे, असे म्हटले तर ८१ टक्के स्त्री-पुरूषांनी मुलींनाही शिक्षण मिळणे आवश्यक आहे, असे म्हटले आहे. उदरनिर्वाहासाठी इतर काही काम करणाऱ्या सर्वच पालकांनी मुलांच्या शिक्षणाला व ९३ टक्के पालकांनी दोघांच्याही शिक्षणाला महत्त्व दिले आहे. प्रोबने याच पालकांचे जातीनिहाय वर्गीकरण केले त्यातीलही सुमारे ८५ टक्क्यांपेक्षा जास्त स्त्री-पुरूषांनी मुलगा मुलगी दोघांच्याही शिक्षणाला सारखेच महत्त्व दिले आहे, तर काहींनी मुलांच्या शिक्षणाला मुलींच्या शिक्षणापेक्षा जास्त महत्त्व दिले आहे.

● मुलांसाठी शिक्षण व मुलींसाठी शिक्षण याबाबतीत अजून बऱ्याच प्रमाणात मतभेद आहेत. मुलांसाठी 'किमान शिक्षण आवश्यक व अतिशय महत्त्वाचे आहे' असे विधान करणारे पालक 'मुलींना शेवटी घरकाम करायचे असते, संसार करायचा असतो, त्यांचे शिक्षण कमी झाले तरी चालेल' अशी मते व्यक्त करतात. कधी सामाजिक रूढींच्या प्रभावामुळे तर कधी गरिबीमुळे ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाने जोर धरलेला नाही. पण ही परिस्थिती हळूहळू बदलत आहे. मुली शिकल्या तर त्यांना संसार नीट करता येईल, मुलांची आजारपणे, शाळा-अभ्यास हे त्यांना योग्य रीतीने समजू शकेल, गरज पडल्यास त्या नोकरी करू शकतील, असे विचार आता समाजमान्य होत आहेत.

शिक्षित मुलींना वरसंशोधनासाठी अडचण येत नाही, अशी मते व्यक्त करणाऱ्या समाजातच मुली जास्त शिकल्या तर त्यांचे लग्न कसे ठरणार? किंवा शिक्षण असले तरी हुंडा द्यावाच लागणार! अशी परस्परविरोधी मते व्यक्त करण्यात येतात. 'आमच्या समाजात मुलींना जास्त शिकवीत नाहीत, असे म्हणणारे पालक आहेत, तसेच 'आपल्या समाजातील इतरांच्या मुली शिकतात तर आपल्या मुलींनाही शिकविले पाहिजे', असे म्हणणारे पालकही आढळतात. असे असले तरी सर्वांसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे. या विधानाला पुष्टी देणाऱ्या पालकांची संख्या ग्रामीण भागात वाढते आहे; आणि हे चित्र नक्कीच उत्साहवर्धक आहे.

*शिक्षण घेतल्याने वृत्तपत्रे वाचणे, परगावी जाऊन कामे करणे, बँकांची कामे करणे, आपले शोषण न होऊ देणे, अन्याय सहन न करणे, स्थानिक प्रशासनात, राजकारणात सहभागी होणे असे अनेक फायदे मिळतात. त्यामुळे समाजात सभ्यपणे / धीटपणे वावरण्यासाठी शिक्षण हे अनिवार्य ठरते.*

● या पालकांच्या मानसिकतेचा अभ्यास करताना एक गोष्ट मात्र प्रकर्षाने जाणवते की पाल्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणारे पालक आपल्या स्वतःच्या व पाल्यांच्या अडचणींबाबत शालेय व्यवस्थापकांशी किंवा शिक्षकांशी मात्र बोलत नाहीत. तसेच पालक आपापसातही फारशी चर्चा करीत नाहीत त्यामुळेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण (विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षण मध्येंच सोडणे) कमी झालेले नाही.

● काही पालक मुला-मुलींनी दोघांनीही शिकले पाहिजे या मताचे असले तरी त्यांनी शाळेत जावेच असा आग्रह ते धरीत नाहीत. या पालकांना शालेय शिक्षणाकडून काही अपेक्षा असतात. उदाहरणार्थ, शिकल्यानंतर मुलाला सरकारी नोकरी मिळावी, त्याची बुद्धिमत्ता वाढावी, शहरात त्याला काही किमान उदरनिर्वाहाचे साधन मिळावे इत्यादी. प्रत्यक्षात मात्र त्यांचा आशा-अपेक्षा शालेय शिक्षणातून पूर्ण होत नाहीत. याची अनेक कारणे आहेत, ती पुढे येतीलच. अर्थात शिक्षणतज्ज्ञांच्या मते शिक्षण हे केवळ नोकरी मिळण्यासाठीचे साधन नाही. पण शिक्षण व नोकरी याची सांगड बहुतांश वेळा समाजातील अनेक घटकांकडून घातली गेली आहे, ग्रामीण भागातील पालकही याला अपवाद नाहीत. प्राथमिक शिक्षण पूर्ण करून काय मिळणार? असा त्यांचा प्रश्न असतो. माध्यमिक व उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण हा त्यांच्यासाठी फारच मोठा प्रवास ठरतो.

● ग्रामीण भागातील अनेक मुलांना शाळेचा अभ्यासक्रम झेपत नाही. त्यांच्या आकलनशक्तीला मर्यादा असतात, कारण, त्यांचे जग सीमित असते. शहरी किंवा पुस्तकी भाषाही त्यांच्या जवळची नसते. त्यामुळे पालकांना त्यांची प्रगती फारशी झालेली दिसत नाही. पण पालक याचा दोष कधी शाळेला तर कधी विद्यार्थ्यांना देऊन मोकळे होतात. आणि मग 'शाळेत पाठवूनही काही फायदा झाला नाही' हा विचार त्यांच्या मनात घर करून बसतो. या मुलांना अभ्यासक्रमातले काही समजले नाही की शिक्षक त्यांना 'ढ' म्हणून सोडून देतात, कधी कधी मारतात, त्यामुळे 'नको ती शाळा व नको तो मार' असे म्हणून ही मुले शाळेत जाणेच बंद करतात.

● आर्थिकदृष्ट्या शिक्षण परवडणारे नाही, असेही काही पालकांशी बोलताना प्रोब गटाला लक्षात आले. केवळ शैक्षणिक फी माफीचा हा प्रश्न नाही. या मुलांसाठी शाळेत मोफत जेवण देणे, पुस्तके, गणवेश व इतर साहित्य पुरविणे याबरोबरच आणखी काही तरतुदी करणे गरजेचे आहे. १९९६-१९९७ च्या वस्तूंच्या किमतीनुसार प्रत्येक मुलामागे प्राथमिक शिक्षणासाठी

(शैक्षणिक शुल्क वगळून) सरासरी खर्च किती येईल याचा अंदाज घेण्यात आला. प्राथमिक स्तरावर राष्ट्रीय नमुना पाहणी (१९८६-८७) च्या अंदाजानुसार हा खर्च २१२ रूपये, प्रोबच्या अंदाजानुसार (१९८६) ३१८ रू. आणि एन. सी. ए. इ. आर. च्या अंदाजानुसार (१९९४) ४७८ रू. आहे. प्रोबच्या सर्वेक्षणानुसार शाळेच्या संदर्भातील खर्चाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे होते. प्रोबने दरवर्षी प्रत्येक पाल्यामागे होणारा खर्च ३१८ रू. धरला आहे. १) शैक्षणिक शुल्क १६ रु. २) शालेय पुस्तके व साहित्य ९९ रु. ३) गणवेश व शाळेला लागणारे कपडे १५९ रु. ४) खाजगी शिकवणी २५ रु. ५) शाळेसाठी जाण्यायेण्याचा व इतर खर्च १९ रु. (एकूण खर्च ३१८ रु.)

● उदरनिर्वाहासाठी शिकण्यापेक्षा लहान वयापासूनच काम करून आपले पोट भरायला शिकणे महत्त्वाचे आहे असे म्हणणाऱ्या पालकांचा एक गट आहे. नाहीतरी शिकून शहरात जाणार म्हणजे आपले मूल दुरावणार, असे काही पालकांना वाटते. याबरोबरच शाळेत जाऊन काही फायदा होत नाही असेही त्यांना आढळते. (याची विविध कारणे आपण आधी बघितली आहेतच.) तेव्हा 'शाळा नको, मग घरी बसण्यापेक्षा काम कर' असे म्हणून हे पालक मुलांना शिक्षणापासून दूरच ठेवतात.

शाळेत कधीच न जाणाऱ्या मुलांची संख्या भारतात बरीच मोठी आहे. त्यामागे वेगवेगळी कारणे आहेत. या विविध कारणांमुळे शाळेत न जाणाऱ्यांची टक्केवारी अशी.

*शिक्षणाचा मूलभूत हक्कात समावेश करावा किंवा प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे किंवा कसे याबाबत मतमतांतरे आहेत. तथापि सक्ती करण्याचा निर्णय घेण्याआधी प्राथमिक शिक्षणाबाबतचे समज-गैरसमज व नेमकी स्थिती जाणून घेणे महत्त्वाचे आहे.*

---

*'मध्यमवर्गीय मूल शाळेत जाते व शिक्षण पूर्ण करते, ह्या मागे त्याला उपलब्ध असलेल्या सुरक्षित वातावरणाचे, पालकांच्या सहकार्याचे, व पैशाचे पाठबळ असते. याशिवाय त्याच्या पालकांना शाळेच्या व्यवस्थापनाशी, शिक्षकांशी व सरकारी यंत्रणेशी कसं वागायचं याची पण जाण असते. नेमकी या उलट गरीब वस्तीतल्या मुलामुलींच्या पालकांची स्थिती असते.*

**विविध कारणांमुळे शाळेत न जाणाऱ्यांची टक्केवारी**

| मुले | कारणे | मुली |
|---|---|---|
| २६ | इतर काही कामे करुन घेण्यासाठी | ४९ |
| ४३ | शालेय शिक्षण खर्चिक आहे | ४४ |
| १५ | शाळा घरापासून दूर आहे | ८ |
| ६ | शालेय शिक्षणाचा दर्जा वाईट आहे | १ |
| २ | शालेय वातावरण | १ |
| ३ | मूल अपंग आहे | १ |
| ६ | मूल पुरेसे हुषार नाही | ४ |
| ३२ | अभ्यासात रस नाही/गोडी नाही | १८ |
| ३७ | पालकांना पाल्यांना शिकविण्यात रस नाही | ३२ |
| २९ | इतर काही करणे | २३ |

अर्थात विपरित परिस्थितीतही जिद्दीने, नेटाने शालेय शिक्षण पूर्ण करणारे विद्यार्थी व तसे करायला लावणारे पालकही आढळतात. पण अशांची संख्या फारच थोडी आहे.

■■

# शाळेतील वातावरण

शिक्षण देणे व घेणे हा एक आनंददायी अनुभव असायला हवा यावर दुमत नसावे. आज अनेक ठिकाणी 'आनंददायी शिक्षण' यावर चर्चा होत आहे यातून काही नवीन योजना आखल्या जात आहेत. या चर्चेतूनच शालेय वातावरण अतिशय प्रसन्न व खेळकर, स्वच्छ, शिक्षणाविषयी आवड व जिज्ञासा उत्पन्न करणारे आणि भीती वा तणावमुक्त असले पाहिजे, हा मुद्दा प्रकर्षाने पुढे येत आहे. शहरांमधील काही अभावात्मक उदाहरणे वगळता अशी परिस्थिती कुठेच नाही असे प्रोब गटाला आढळले आहे.

उत्तरप्रदेशातील मुजफ्फरनगर जिल्ह्यातील सालेमपूर गावातील सर्वेक्षणात, मुले शाळेत जाण्यास नाखूष का असतात याचे उत्तर मिळाले. या प्राथमिक शाळेत तीनच खोल्या होत्या. पहिली व दुसरीच्या मुलांना एकत्र एका खोलीत बसविण्यात आले होते. शेळ्या-मेढ्यांचा कळप जसा बसतो तसे ते दृष्य होते. तीनही खोल्या लहानशा, अंधाऱ्या व अस्वच्छ होत्या. शाळेतील व शाळेबाहेरचे वातावरण अतिशय उदास व शांत होते. शाळेला कुलूप लावायचीही सोय नव्हती. अजून कळस म्हणजे शाळेतील चारही शिक्षक अतिशय निरूत्साही होते. शाळेत बसलेल्या मुलांकडे शिक्षकांचे लक्षही नव्हते. काही शिक्षक तर वर्गात मुलांना बसवून स्वतः पत्ते खेळतात, अशी तक्रार या गावातील पालकांनी केली होती.

या गावात ६ ते १४ वयोगटातील किमान ७००-८०० मुले होती म्हणजेच किमान ४-५ शाळा तरी येथे हव्या होत्या. पण येथे एकच सरकारी शाळा होती व तीही अशी. एक-दोन खाजगी शाळाही सर्वेक्षणात आढळल्या पण अनेक पालकांची तिथे मुलांना पाठविण्याइतकी चांगली आर्थिक परिस्थिती नव्हती. सालेमपूरमधील बहुतांश मुले शाळेपासून एक ते दीड किलोमीटर्स अंतरावर राहात होती. पण तरी शाळेची सर्व मुलांना सामावून घेण्याची क्षमता नव्हती. हे एक उदाहरण झाले. पण प्रोबने इतरत्र केलेल्या सर्वेक्षणानुसारही शाळेसंदर्भात पायाभूत सोयीसुविधांमध्ये (Infrastructural facilities) सुधारणा

*शाळेतील वातावरण चांगले असले तर मुलांना शिकायला आवडतं, नवीन मित्र करायला - खेळायला आवडतं असं लक्षात येतं. शिकून खूप मोठं व्हायचय यापेक्षा सध्या त्यातून 'मजा येतेय' हे कारण मुलांसाठी महत्त्वाचं असतं.*

करण्याची गरज आहे हे सिद्ध होते. शाळेच्या इमारतीचे बांधकाम पक्के हवे, मुला-मुलींसाठी वेगळी स्वच्छतागृहे असावीत व ती वापरण्यायोग्य असावीत, पिण्याच्या स्वच्छ पाण्याची सोय असावी, शाळा एकशिक्षकी नसाव्यात, फळे, खडू व इतर शैक्षणिक साहित्य यांची कमतरता नसावी, या बाबींचा विचार प्रोबने केला. त्यांना आढळणारे चित्र खालीलप्रमाणे आहे.

| | पक्के बांधकाम असणाऱ्या शाळांची टक्केवारी |
|---|---|
| १) पक्के बांधकाम असणारी एकही खोली नाही | ३१ |
| २) किमान एक खोली | ११ |
| ३) किमान दोन खोल्या | ३७ |
| ४) दोनपेक्षा जास्त खोल्या | २१ |

| दुरुस्ती कशाबाबत? | दुरुस्ती आवश्यक असणाऱ्या शाळांची टक्केवारी | |
|---|---|---|
| | १९८६ पूर्वी बांधलेल्या शाळा | १९८६ नंतर बांधलेल्या शाळा |
| १) जमीन नीट नाही | ६८ | ५८ |
| २) भिंतींची दुरुस्ती | ४१ | ३० |
| ३) छप्पर दुरुस्ती | ६३ | ४६ |
| ४) दारे / खिडक्या | ६३ | ३७ |
| ५) वरील सर्व प्रकारची दुरुस्ती आवश्यक असणाऱ्या शाळा | ३० | १५ |
| ६) वरीलपैकी कोणतीच दुरुस्ती नको | १६ | २७ |

'पाचव्या अखिल भारतीय शैक्षणिक सर्वेक्षणा'नुसार (१९८६) पूर्वीच्या तुलनेत आता परिस्थिती बऱ्याच प्रमाणात बदलली असली तरी यात सुधारणा करण्याची गरज आहेच, असे प्रोबने म्हटले आहे.

प्रोबने १६२ सरकारी प्राथमिक शाळांचे सर्वेक्षण केले. त्यात त्यांना खालील बाबी आढळल्या.

१) इमारत नसल्याने सहा शाळा मोकळ्या पटांगणात भरविण्यात येत होत्या.

२) काही शाळांजवळ स्वतःची इमारत नसल्याने त्या पंचायत घर, धर्मशाळा किंवा तत्सम ठिकाणी भरवण्यात येत होत्या. त्यामुळे शिकविण्यात बऱ्याच अडचणी येत होत्या.

३) किमान दोन खोल्यांचे पक्के बांधकाम असलेल्या ५८% शाळा आढळल्या.

४) छप्पर गळतीच्या प्रश्नाला ६० टक्के शाळांना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे पावसाळ्यात वर्गात बसणे अशक्य होऊन शिकविण्याच्या प्रक्रियेत कित्येक दिवस खंड पडत होता.

५) कोठे ना कोठे डागडुजी करून शाळेची इमारत नीट करण्याची गरज तर बहुतांश शाळांना होती.

६) काही शाळांमध्ये शिकविण्याव्यतिरिक्त इतर कामेही चालतात असे आढळले. यात पंचायत समितीच्या बैठका, पोलिसांचे शिबीर, कधी निवडणुकांची कामे तर कधी आरोग्य विषयक शिबिरे असा विविध कामांचा समावेश होता. अपवादात्मक ठिकाणी गोवऱ्या वाळविणे व काही इतर सामग्री ठेवण्यासाठी गोदाम म्हणूनही शाळेचा वापर करण्यात आल्याचे निष्पन्न झाले.

७) जिथे शैक्षणिक साधनसामग्री होती तिचा फारसा उपयोग झालेला नाही, असे लक्षात आले. म्हणजे कधी शाळेत जागा नाही म्हणून शिक्षकांनी साहित्य घरी किंवा इतरत्र ठेवलेले तर कधी मुलांनी हात लावू नये म्हणून शिक्षकांनी ते पेटीत बंद करून ठेवल्याचे दिसले. अनेक शिक्षक स्वतःहूनच हे साहित्य वापरत नाहीत हेही स्पष्ट झाले.

प्रोब गटाने सर्वेक्षण केलेल्या खेड्यांमधील काही प्राथमिक शाळांमध्ये जी काही शैक्षणिक साधनसामग्री उपलब्ध होती त्याचा वापर कसा-कसा होतो त्याबाबतची टक्केवारी लक्षात घेणे अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल.

*ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षण पूर्ण करावे यासाठी त्या विद्यार्थ्यांना, त्यांच्या पालकांना तसेच वेळप्रसंगी त्यांच्या शिक्षकांना बरेच प्रयत्न करावे लागतात.*

| साधनसामग्री (वापराची टक्केवारी) | आहे व ती वापरात आहे | आहे पण वापरली जात नाही | शैक्षणिक साधने नाहीतच |
|---|---|---|---|
| १) प्रत्येक वर्गात | ७४ | ९ | १७ |
| २) खेळण्यासाठी मैदान | ४८ | ८ | ४४ |
| ३) पिण्याचे पाणी | ४१ | ५ | ५४ |
| ४) नकाशे व तक्ते | ४१ | १५ | ४४ |
| ५) शिक्षकांसाठी असलेले साहित्य | ३३ | १२ | ५५ |
| ६) खेळणी | २५ | १४ | ६१ |
| ७) ग्रंथालय | २३ | ५ | ७२ |
| ८) संगीत शिकण्यासाठी वाद्ये | १५ | १६ | ६९ |
| ९) स्वच्छतागृहे | ११ | ५ | ८४ |

८) ज्या ज्या शाळांमध्ये एक किंवा दोनच शिक्षक असतात तिथे शिक्षक कोणा-कोणाकडे लक्ष देणार? व कोणाला कसे शिकविणार? असा प्रश्न काही ठिकाणी पालकांनीच उपस्थित केला. तसेच, 'शाळेच्या अडचणी जास्त, शिकविणे कमी, म्हणूनच आम्ही मुलांना शाळेत पाठवीत नाही' असेही त्यांनी लगेच स्पष्ट केले. पारसपूर (बहराईच, उत्तरप्रदेश) येथे १५७ मुले असलेल्या सरकारी प्राथमिक शाळेत फक्त एकच शिक्षक व तेही मुख्याध्यापक असल्याचे आढळले. बिहार मधील सिवान गावाजवळच्या खेड्यात एक शिक्षक एकाचवेळी वेगवेगळ्या दोन वर्गातील मुलांना शिकवीत होते, असे दृष्य बघावयास मिळाले.

९) याशिवाय शिक्षकांच्या शिकविण्याच्या पद्धती कोणत्या? ते नेमके काय व कसे शिकवितात? शिकविलेले मुलांना समजते का? शिकविण्यासाठी शिक्षक किती वेळ देतात व कार्यालयीन किंवा इतर कामात त्यांचा वेळ किती जातो? या प्रश्नांचाही विचार करण्यात आला. अनेक शाळांमध्ये शिकविण्यावर २५ टक्के, इतर कामात ४२ टक्के व सुट्या, रजा यात ३३ टक्के वेळ जातो असे आढळले. असा परिस्थितीत विद्यार्थी शिकण्यात रस घेत नाहीत व पालकही मुलांना शाळेत पाठविण्यास उत्सुक नाहीत, असे चित्र दिसले तर त्यात नवल वाटण्याचे कारण नाही.

१०) जातीभेद, वर्गभेद, लिंगभेद होऊ नये असे वाटत असले तरी हे भेद संपलेले नाहीत. शहरांमध्ये शिक्षणासंदर्भात हे भेद, कदाचित कमी प्रमाणात

असतील पण छोट्या छोट्या वस्तीत, खेड्यात व गावात मुलगा-मुलगी हा भेद केला जातोच. शिवाय अमक्या जातीने तमक्या जातीच्या मुलांबरोबर बसायचे नाही, अशाही प्रकारचा भेद वागणुकीतून स्पष्टपणे दिसतो. अशा अनेक कारणांमुळे विद्यार्थ्यांची व पालकांची मनस्थिती शिकण्यासाठी / शिकविण्यासाठी तयार नसते.

आनंददायी शिक्षणासाठी शालेय वातावरण हा किती महत्त्वाचा घटक आहे हे यावरून लक्षात येते. तसेच शिक्षण सर्वत्र पोहचविण्यासाठी कोणकोणत्या बाजूंनी प्रयत्न करायला हवेत याचेही उत्तर मिळते.

■■

*बालकामगारांना काम असतं म्हणून ते शाळेत जात नाहीत यापेक्षा त्यांनी इतर काही कारणांनी शाळा सोडली असते म्हणून ते काम करतात ही वस्तुस्थिती आहे.*

## वर्गात नेमके काय घडते?

प्राथमिक शिक्षण हा जीवनाचा पाया. तो मजबूत असला तर पुढील शिक्षणाची इमारत पक्की होऊ शकते. हा पाया कसा आहे हे जाणून घेण्यासाठी आपल्याला सरकारी शाळांमधील वर्गावर्गात डोकावले पाहिजे. शाळेची इमारत, इतर साधन-सामग्री, पालकांची मानसिकता या सर्वांच्या बरोबरीने अभ्यासक्रम व पुस्तके, त्यातील भाषा, शिक्षकांची शिकविण्याची पद्धत, शिक्षकांनी शिकविलेले मुलांना नेमके किती प्रमाणात समजते. या प्रश्नांचा विचार करण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या गळतीमागे व पालकांनी शिक्षणाचा आग्रह न करण्यामागे हे प्रश्नही कारणीभूत आहेत असे प्रोब गटाला सर्वेक्षणातून जाणवले.

● दिल्लीच्या प्रतिष्ठित भागातील सरकारी प्राथमिक शाळेतील वर्गाची पाहणी प्रोब गटाने केली. प्रतिष्ठित साहेबांकडे कामाला येणाऱ्या चतुर्थ श्रेणीतील कामगारांची मुले या शाळेत शिकत होती. शाळेची इमारत एकदम व्यवस्थित, खोल्या हवेशीर, भरपूर सूर्यप्रकाश आणि वर्गातील टापटीप व स्वच्छता दखलघेण्यासारखी. पालकांनाही शिक्षणाचे महत्त्व पटलेले. या शाळेतील मुलांना आतापर्यंत आपण बघितलेली कोणतीही अडचण नव्हती. प्रोब गटाने पाहणी केली तेव्हा शिक्षक मुलांना हवा, पाणी, निसर्ग याविषयी माहिती देत होते. शिक्षकांनी पुस्तकातून एखादे वाक्य वाचायचे व मुलांनी शिक्षकांच्या पाठोपाठ ते वाक्य म्हणायचे असा क्रम सुरू होता. ती वाक्ये नमुन्यादाखल अशी 'हवा सर्वत्र आहे.' 'हवेला स्वतःचा कोणताही आकार नाही.' 'हवा म्हणजे अनेक वायूंचे मिश्रण होय' आता या वाक्यांमधून त्या मुलांना हवेबद्दल नेमका कोणता बोध झाला हे तपासून पाहिले, तेव्हा असे लक्षात आले की त्यांना केवळ ती वाक्ये पाठ झाली होती. हवा म्हणजे काय, ती कशी असते, कुठे-कुठे असते, हवा कशी तयार होते हे त्यांना समजलेलेच नव्हते. म्हणजेच शिकविण्याची पद्धत व जे शिकवितो / शिकतो ते आपण प्रत्यक्ष बघतो का, ते जाणवून घेतो का हे महत्त्वाचे आहे. केवळ अशी वाक्ये मुलांकडून पाठ करून घेण्याऐवजी साधा कागदाचा पंखा करून तो हलविला की वारा येतो म्हणजे हवा सर्वत्र आहे किंवा बादलीत पाणी घेऊन त्यात रिकामे भांडे बुडविल्यावर जे बुडबुडे येतात ती म्हणजे हवा होय, वर्गाबाहेर जाऊन झाडाची पाने हलतात तेव्हा वारा वाहतो असे सांगून, ते शिक्षकांनी दाखवून, त्याचा मुलांनी अनुभव घेतला तर त्यांना ते जास्त चांगले समजू शकेल का? असा विचार करून शिकविण्याच्या पद्धती बदलल्या पाहिजेत का? यावर विचार विनिमय होण्याची गरज आहे.

● गणित, भाषा, परिसर शिक्षण अशा अनेक विषयांबाबतही असेच घडते. याचे एक कारण म्हणजे बोली भाषा व पुस्तकी भाषा वेगळी असते, त्यामुळे मुले गोंधळतात. बेरीज-वजाबाकी शिकवितानाही बेरीज म्हणजे वाढ होणे व वजाबाकी म्हणजे कमी होणे / घटणे, या मूळ कल्पना मुलांना समजल्या पाहिजेत. पण त्या आकड्यांच्या जंजाळात या मुलांना ही मूळ कल्पना (Basic Concept) स्पष्ट होत नाही. गुणाकार, भागाकार यातही असेच घडते. मग, 'गणित खूप कठीण', अशी भूमिका तयार व्हायला लागते. झाडाचे चित्र दाखवून त्याची माहिती सांगण्याबरोबरच विविध झाडे दाखवून, त्यांचे बी / रोप मिळवून ते लावण्यातून / झाडे जगविण्यातून जे ज्ञान मिळते ते पुस्तकातून कसे मिळणार? तरी ही शहरातील शाळा होती. छोट्या छोट्या खेड्यांमध्ये अशा पुस्तकी भाषेने मुलांचे ज्ञान कसे वाढणार?

● खेड्यांमधील शाळेतील मुलांच्या पुस्तकात वाहतुकीचे नियम लिहिलेले प्रोब गटाला आढळले. ज्या मुलांनी सायकल व बैलगाडीशिवाय दुसरे वाहन बघितले नाही त्यांना शहरातील वाहतुकीचे नियम समजावून सांगून काय उपयोग? परिसर शिक्षण, नागरिक जीवन असे विषय शिकवितानाही ग्रामीण भाग कसा आहे याचा विचार करून अभ्यासक्रम, पुस्तके त्यातील भाषा व चित्रे तयार करण्यात आली पाहिजेत. ग्रामपंचायतीचे कामकाज शहरातील मुलांना समजावून सांगणे वेगळे व खेड्यातील मुलांना शिकविणे वेगळे.

● खेड्यातील व शहरातील सण-वार, उत्सव साजरे करण्याच्या पद्धतीही वेगवेगळ्या असतात. त्यामुळे सर्वांना समान अभ्यासक्रम असला तरी तो शिकविताना सभोवतालचे वातावरण लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते. शहरातील मुलांच्या दिवाळी साजऱ्या करण्याच्या पद्धती, त्यांचे सुट्ट्यांमधील कार्यक्रम व खेड्यातील मुलांची दिवाळी यात जमीन-अस्मानचे अंतर आहे. पोळा हा सण ग्रामीण भागात जेवढा महत्त्वाचा असतो तेवढेच महत्त्व त्याला शहरी भागात मिळत नाही.

● शारीरिक स्वच्छता हा विषय शिकवितानाही पुस्तकांमध्ये ज्या ज्या साधनांचा उल्लेख असतो, ती सर्वच साधने खेड्यात उपलब्ध असतातच असे नाही. डोक्यावरचे केस स्वच्छ न केल्याने होणारा उवांचा त्रास शहरातील

> *ग्रामीण भागातील अनेक मुलांना शाळेचा अभ्यासक्रम झेपत नाही. त्यांच्या आकलनशक्तीला मर्यादा असतात, कारण, त्यांचे जग सीमित असते. शहरी किंवा पुस्तकी भाषाही त्यांच्या जवळची नसते.*

मुलांना समजू शकणार नाही. तर शहरातील वाढत्या प्रदूषणाचा प्रश्न ग्रामीण भागात समजणार नाही. घरांच्या बांधकामाविषयीच्या माहितीतही स्वयंपाकघर, स्वच्छतागृहे / प्रसाधनगृहे, झोपण्याची वेगळी खोली, पाहुणे आले तर बसण्याची वेगळी बैठक, अशी चित्रे पुस्तकात असतात. सिमेंटची पक्की घरे, दगड-विटांची घरे व झोपड्या अशीही चित्रे असतात. स्वयंपूर्ण, चांगल्या घराची व्याख्या ही शहरातील घरांची शिकविली जाते. त्यामुळे आपल्या झोपड्या वाईटच असतात असे या मुलांच्या मानावर कळत नकळत ठसत जाते.

- भूगोल शिकविताना तर वाघ, सिंह कुठे आढळतात? अशाच थाटात 'आदिवासी कुठे आढळतात?' असा प्रश्न विचारला गेल्याचे प्रोब गटाला आढळले.

- भाषा शिकविण्याची आणखीच वेगळी तऱ्हा आहे. साधारणपणे या राज्यांची (मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, बिहार व राजस्थान) भाषा हिन्दी आहे असे मानले जाते. पण प्रत्येक राज्यातील जिल्ह्याजिल्ह्यांमध्ये हिंदी बोलण्याच्या पद्धती वेगळ्या आहेत. मध्यप्रदेशातील हिंदी व बिहारमधील हिंदी यात बरेच अंतर आहे. तेव्हा शिक्षकाने मुलांच्या बोलीभाषेशी जवळीक साधून शिकविले तर ते त्यांना चटकन समजू शकते, त्यातून त्यांची आकलनशक्ती वाढू शकते, पण प्रत्यक्षात केवळ पुस्तकी ज्ञान मिळवून परीक्षा उत्तीर्ण होणे, हे अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट असल्याने या सर्व बाबींचा विचार गांभीर्याने करण्यात आला नसल्याचेच आढळते.

- शिक्षण देणे म्हणजे सतत नवनवीन माहिती (information) देणे असा एक अर्थ प्रचलित आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना लहान वयातच अनेक संज्ञा (Terms), अनेक प्रक्रिया, विविध वस्तूंचे उपयोग अशी माहिती देण्यात येते. ही माहिती सोप्या भाषेत असली तरी ती केवळ भाषेकरवी समजण्यासारखी नसते. उदाहरणार्थ, पाण्याची वाफ होते, वाफ म्हणजे पाण्याचे वायुरूप, ही वाफ वातावरणात वर जाऊन त्याचे ढग तयार होतात व पाऊस पडतो, ही वाक्ये समजण्यास सोपी असली तरी ते समजून-उमजून सांगणे वा लिहिणे विद्यार्थ्यांना जड जाते. अशा अभ्यासक्रमांमधून मुलांची उत्सुकता, प्रश्न विचारण्याची व उत्तरे शोधण्याची क्षमता, विचारशक्ती वाढत नाही. विद्यार्थी पाठांतर करून परीक्षेत उत्तरे लिहून मोकळी होतात.

आजूबाजूच्या गोष्टींबद्दल कुतुहल वाटणे, त्यामधून प्रश्न व त्यांचे उत्तर मिळविण्यासाठी औत्सुक्य असणे, तार्किकता, विचारशक्ती, आकलनशक्ती, स्मरणशक्ती वाढून उत्तर मिळविणे, म्हणजे ज्ञान मिळणे किंवा शिक्षण मिळणे

होय. मुंबईसारख्या शहरात, इयत्ता चौथीतील विद्यार्थ्यांना एका आठवड्याच्या सुट्टीत एक ते दहाहजार या संख्यांची नावे (शब्दात) लिहून आणण्याचा निरर्थक गृहपाठ देण्यात आला होता. अशा बऱ्याच त्रुटी शाळांच्या अभ्यासक्रमात आढळतात. पण आपण सर्व बाबींचा परामर्ष इथे घेऊ शकत नाही. तेव्हा आता मूल्यांकन व परीक्षा पद्धतीचा थोडक्यात विचार करू.

● शिक्षणपद्धतीतून मिळणारे हे ज्ञान विद्यार्थ्यांना कितपत समजले, ते जाणून घेऊन त्यांची पुढील शिक्षणासाठी पूर्वतयारी झाली किंवा नाही हे समजण्यासाठी परीक्षा घेतल्या जातात. मूल्यांकन आणि परीक्षा हे विद्यार्थ्यांसाठी, शिक्षकांसाठी व पालकांसाठी एक दिव्यच ठरते, अशी सध्याची परीक्षा पद्धती आहे. विद्यार्थ्यांच्या आकलन शक्तीनुसार त्यांनी समजून उत्तरे लिहिण्यापेक्षा पुस्तकी वाक्ये जशीच्या तशी पेपरमध्ये लिहिणे, याला महत्त्व देण्यात आले आहे. त्यामुळे काहीही न समजणारी मुले परीक्षा उत्तीर्ण होऊ शकतात. तसेच बोर्डाची परीक्षा ही दुर्लक्षित सरकारी शाळेतील मुलांसाठी व इतर शहरातील मोठ्या खाजगी शाळेतील मुलांसाठी एकच असते. समान पातळीवरील दोन मुलांचे एकाच परीक्षेद्वारे मूल्यांकन करणे योग्य ठरू शकते. पण असमान पातळीवरील दोन मुलांचे एकाच पद्धतीने मूल्यमापन किंवा त्यांच्यासाठी समान परीक्षा योग्य कशी ठरेल? पण सध्याच्या परीक्षापद्धतीत हा विचार करण्यात येत नाही. त्यामुळे अनुत्तीर्ण होणाऱ्यांची संख्या वाढते. यातूनच 'कॉपी' सारखे गैरप्रकार वाढतात. अनेक ठिकाणी तर शिक्षकच मुलांना कॉपी करण्यास प्रोत्साहन देतात, असे प्रोब गटाला आढळले.

यासंदर्भात शिक्षकांशी बोलताना जाणवले की, मुलांवर मेहनत करूनही ते अनुत्तीर्ण झाले तर तो दोष वा अपयश शिक्षकांच्या माथी मारले जाते. त्यामुळे असहाय्यतेमधून शिक्षक 'कॉपी' चा मार्ग विद्यार्थ्यांना मोकळा करून देतात.

अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना अपयश पचविता न आल्यास ते आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त होतात. दरवर्षी अशा घटना आपण वृत्तपत्रांमधून वाचत असतोच. तेव्हा एक शैक्षणिक व सामाजिक प्रश्न म्हणून याकडे अतिशय गांभीर्याने बघितले गेले तर परीक्षा पद्धतीत सुधारणा होतील, असे प्रोबने म्हटले आहे.

■■

*खेड्यातील मुलांना अभ्यासक्रमातले काही समजले नाही की शिक्षक त्यांना 'ढ' म्हणून सोडून देतात, कधी कधी मारतात, त्यामुळे 'नको ती शाळा व नको तो मार' असे म्हणून ही मुले शाळेत जाणेच बंद करतात.*

# शिक्षकांना काय वाटते?

प्राथमिक शिक्षणाचा विचार करताना 'प्राथमिक शिक्षक' या महत्त्वपूर्ण घटकाचा विचार गांभिर्याने केला पाहिजे. मुलांना ज्या वयात, पुरेशी समज आलेली नसते, लिहिता - वाचता येऊनही व्यवहार कळत नसतो, अशा कोवळ्या वयात ही उमलती मुले प्राथमिक शिक्षकांच्या संस्कार छत्राखाली वाढत असतात. या वयात आजूबाजूच्या वातावरणातून (बघणे, ऐकणे, अनुभवणे, अनुकरण करणे) मुले बरेच काही शिकत असतात. याच वयात त्यांच्या शिक्षकांचा त्यांच्यावर प्रभाव पडत असतो. या वयातील मुलांच्या गुणवत्तेचे माहेरघर म्हणजे प्राथमिक शाळा. शाळेलाच 'जीवनशिक्षण मंदिर' अशी उपमा देण्यात येते मात्र शाळेची वास्तू, क्रीडांगण आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'शिक्षक' यांकडे कोणाचेच लक्ष नसते. 'शिक्षक' या भूमिकेचे महत्त्व निर्विवाद असताना ती उपेक्षित राहिली आहे. या भूमिकेतील 'संस्कारदूत' मुलांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण, पायाभरणी करीत असतात हे विसरले जाते.

प्रोब गटाने प्राथमिक शिक्षकांची ही कोंडी फोडण्याचा प्रयत्न केला. त्यांनी या शिक्षकांची पार्श्वभूमी, त्यांच्या अडचणी व तक्रारी आणि अपेक्षा जाणून घेतल्या. त्यातून या प्रश्नाचा आणखी एक आयाम आढळला. प्रोब गटाला आढळले की पूर्वीच्या काळातील बहुतांश 'गुरूजी' उच्चवर्णीय होते तसेच स्त्रियांना शिक्षिका म्हणून समाजमान्यता नव्हती. आज मात्र विविध जाती-धर्म-वर्गाच्या व्यक्तींना शिक्षण क्षेत्रात स्थान मिळाले असून स्त्रियांनाही शिक्षिका म्हणून मान्यता मिळाली आहे. शहरांमध्ये तर कदाचित शिक्षिकांची संख्याच जास्त असावी.

खेड्यात, ग्रामीण भागात शिक्षकांच्याबाबतीत अजूनही जात, वर्ग व लिंगभेद केला जातो असे आढळते. साधारणपणे सरकारी प्राथमिक शाळेतील शिक्षक/शिक्षिका ग्रामीण भागातीलच उच्चवर्गीयांमध्ये मोडतात. तसेच नोकरी करण्यापूर्वी त्यांची आर्थिक स्थितीही बरी असते. प्रोबने सर्वेक्षण केल्याप्रमाणे शिक्षकांची टक्केवारी अनुसूचित जाती जमाती २०%, इतर मागासवर्गीय १९%, इतर हिंदुधर्मीय ५३%, मुस्लिम ५%, व इतर ३% अशी आहे. शिक्षकांच्या तुलनेत शिक्षिकांची संख्या बऱ्याच प्रमाणात कमी आढळली. प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापिकांचे प्रमाण १० टक्क्यांपेक्षाही कमी असल्याचे लक्षात आले तर ६० टक्के प्राथमिक शाळांमध्ये एकही शिक्षिका नाही असे प्रोबने म्हटले आहे.

या सामाजिक परिस्थितीत हळूहळू बदल होत आहे, असे प्रोबला आढळले. प्राथमिक शिक्षक / शिक्षिकांच्या शैक्षणिक पात्रतेबद्दल प्रोबने म्हटले आहे की बहुतांश व्यक्तिंनी उच्च माध्यमिक शिक्षण (१० वी / १२ वी) पूर्ण केले असून नोकरीपूर्व "Basic Training Course" (BTC) हे प्रशिक्षण घेतले आहे. या प्रशिक्षणाचा कालावधी सुमारे दोन वर्षाचा आहे. काही तरुण शिक्षक / शिक्षिका बी.ए. किंवा एम.ए. असे पदवीधारक असले तर त्यांनी खास प्रशिक्षण मात्र कमी प्रमाणात घेतले आहे असे प्रोबचे म्हणणे आहे. प्रोबच्या सर्वेक्षणातील एकूण शिक्षकांपैकी एक तृतीयांश व्यक्तींनी नोकरीपूर्व प्रशिक्षण घेतलेले नसून ३५ वर्षाखालील निम्या व्यक्तींनी प्रशिक्षण घेतलेले नाही. हे प्रशिक्षण उपयुक्त आहे असेच मत बहुतेक सर्वांनी व्यक्त केले. अर्थात प्रशिक्षणपद्धतीवर काहींनी उपहासगर्भ टीकाही केली. काहींनी म्हटले की प्रशिक्षण घेतले तरी शाळेत तशी साधनसामग्री असतेच असे नाही.

शिक्षकी पेशाला वाहून घेण्याच्या उद्देशाने शिक्षक होणे आणि केवळ पगारासाठी किंवा दुसरी नोकरी मिळाली नाही म्हणून शिक्षक होणे वेगळे, हे प्रोबला प्रकर्षाने जाणवले. अर्थात अनेकदा सुरुवातीला उत्साही असणारे शिक्षक काही नकारात्मक अनुभवाने मरगळतात असेही प्रोबला आढळले आहे.

शिक्षकांची पार्श्वभूमी लक्षात घेतल्यानंतर या शिक्षकांच्या नेमक्या अडचणी कोणत्या? याचा विचार प्रोबने करण्याचे ठरविले. नेहमी विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या तक्रारी ऐकणारे शिक्षक हळूहळू आपल्या तक्रारी मांडू लागले. या तक्रारी, पालकांच्या तक्रारी आणि शिक्षणव्यवस्था यांचा परस्परसंबंध सहजपणे प्रोबने उलगडून दाखविला आहे.

### (१) पायाभूत सोयीसुविधांचा अभाव

ग्रामीण भागातील शाळांची दुर्दशा एवढी आहे की शिक्षकी पेशाला उत्साहाने स्वीकारणारा (Self Motivated) शिक्षकही कंटाळून निरुत्साही होईल. तथापि ६८ टक्के शिक्षकांनी आपल्या पगाराबद्दल आपण समाधानी आहोत, असे नमूद केले आहे, तर ८६ टक्के शिक्षकांनी सुट्ट्या व रजा यांबाबत तक्रार नसल्याचे म्हटले आहे.

> *खेड्यातील शाळेतील मुलांच्या पुस्तकात वाहतुकीचे नियम लिहिलेले प्रोब गटाला आढळले. ज्या मुलांनी सायकल व बैलगाडीशिवाय दुसरे वाहन बघितले नाही त्यांना शहरातील वाहतुकीचे नियम समजावून सांगून काय उपयोग?*

शाळेला इमारत नसणे, पुरेशी शैक्षणिक साधन-सामग्री नसणे, शिक्षकांची व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पुरेशी संख्या नसणे, विद्यार्थ्यांची संख्या जास्त असणे अशा प्रकारच्या तक्रारी ६३ टक्के शिक्षकांनी केल्या आहेत. यापूर्वी याबाबत सविस्तर चर्चा झाल्याने त्याचा विचार परत येथे करण्यात आलेला नाही.

**(२) पालकांचे औदासिन्य**

बहुतांश शिक्षकांनी 'पालकांच्या निरुत्साहामुळे आपल्या उत्साहावर पाणी पडते', अशी तक्रार प्रोबकडे केली आहे. पालक मुलांना व्यवस्थितपणे नीटनेटक्या कपड्यात व पुस्तके - दप्तरासकट शाळेत आणत नाहीत, शाळा बुडली तरी काळजी करत नाहीत, पालक-शिक्षक सभांना येत नाहीत, शाळेत भेटायला बोलावले तर 'सतत आम्हाला त्रास का देता?" अशी उलट विचारणा करतात. असे या शिक्षकांनी नमूद केले आहे. पालकांबाबतच्या विश्लेषणात हे मुद्दे आले आहेतच.

**(३) विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी व मानसिकता**

ग्रामीण भागातील विद्यार्थी म्हणजे, अनेकदा, त्या त्या घरातील शिकणारी पहिली पिढी असते. त्यांच्या पालकांचा शिक्षणाशी कोणत्याही प्रकारे संबंध आलेला नसतो. त्यामुळे फाटक्या कपड्यात, पाटी-पुस्तके नसताना ही मुले शाळेत येतात. याशिवाय त्यांचे शिक्षणात लक्षच नसते. उनाडक्या करणे, खेळणे-मस्ती करणे यातच ते रमतात, अशा अनेक तक्रारी शिक्षकांनी केल्या आहेत.

**(४) अभ्यासक्रमाचा बोजा**

विद्यार्थ्यांच्या घरांतील व ग्रामीण भागातील सामाजिक, शैक्षणिक वातावरण बघता, या मुलांसाठी अभ्यासक्रम अवघड आहे असे बहुतांश शिक्षकांना वाटते. त्यामुळे शिकण्याच्या किमान पातळीवरील ज्ञान या मुलांना देता येत नाही, दिले तरी ते त्यांना समजत नाही असे शिक्षक म्हणतात. राजधानीत बसून अभ्यासक्रम ठरविणे वेगळे व प्रत्यक्षात तो पूर्ण होणे (कागदोपत्री नव्हे) ही वेगळीच बाब आहे असे शिक्षकांनी म्हटले आहे. जो काही अभ्यासक्रम आहे तो ही सोप्या सरळ भाषेत, त्यांना समजेल अशा पद्धतीने मांडण्यात आला नाही असे प्रोबला आढळले.

**(५) नको असलेल्या गावी बदल्या**

अनेकदा, सरकारी शाळेतील शिक्षकांच्या दूरच्या गावी, दुर्गम भागात बदल्या होतात, त्याचा शिक्षकांना फार त्रास होतो. त्यागावी राहण्याच्या सोयी

नीट नसतात म्हणून काही शिक्षक त्यागावी जाण्यास नाखूष असतात, शिवाय त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न त्यांना असतोच. 'आमचे हे प्रश्न सोडविले जात नाहीत', अशी तक्रार या शिक्षकांनी केली. काही शिक्षक खेड्यात रोजचे जाणे-येणे त्रासदायक असते म्हणून तेथे बदली नको, असे म्हणतात. 'बदली होणे' म्हणजे 'शिक्षा' किंवा 'धमकी' असेच शिक्षक समजतात. त्यामुळे या तक्रारीचा गंभीरपणे विचार करण्यात यावा असे प्रोबने म्हटले आहे.

**(६) कागदपत्रांचे अवास्तव स्तोम**

शाळेच्या प्रशासकीय कामासंदर्भातील कागदपत्रे लिहिणे, तपासणे, अहवाल तयार करणे, हिशेब ठेवणे अशा अपेक्षा शिक्षकांकडून केल्या जातात. त्यामुळे दैनंदिन शिकविण्याच्या कामाशिवाय 'कागदोपत्रात बुडणाऱ्या' शिक्षकांनी याबाबत तक्रार केली आहे.

**(७) शिक्षकांकडून शिक्षकेतर कामांच्या अपेक्षा**

निवडणुका, आरोग्यसेवा, सामाजिक उत्सव, सण-समारंभ या सर्व कामात शिक्षकांना गृहित धरण्यात येते, अशी व्यथा अनेक शिक्षकांनी बोलून दाखविली. सरकारी योजना आखल्या गेल्या की शिक्षकच त्यात भरडला जातो असे म्हणण्यात आले आहे. कागदोपत्रांचे ढीग उपसता उपसता व इतर कामे करता करता शिकविण्याच्या मुख्य कामाकडे दुर्लक्ष होते किंवा पुरेसे लक्ष देता येत नाही, असे या शिक्षकांचे म्हणणे आहे.

शिक्षणेतर कामांवर शिक्षकांचा वेळ कशाप्रकारे खर्च होतो त्याची पाहणी प्रोबने केली. त्यावेळी पाहणीच्या आधीच्या चार आठवड्यापैकी किमान एक दिवस शिक्षकांचा अशा कामांवर खर्च झाला, अशा शिक्षकांची टक्केवारी पुढील प्रमाणे आहे. ही विविध कामे एकमेकाशी संलग्न आहेत. त्यामुळे याची बेरीज १०० येणार नाही.

| | |
|---|---|
| पंचायतीशी व समाजाशी संबंधित कामांवर | ३८ |
| आरोग्यसेवा विषयक | ३३ |
| प्रशासकीय | १७ |
| शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत आहार/जेवण | १० |

*परिसर शिक्षण, नागरिक जीवन असे विषय शिकवितानाही ग्रामीण भाग कसा आहे याचा विचार करून अभ्यासक्रम, पुस्तके त्यातील भाषा व चित्रे तयार करण्यात आली पाहिजेत.*

| | |
|---|---|
| प्रशिक्षणाशी संबंधित | १० |
| प्रोत्साहनात्मक | ९ |
| कुटुंब नियोजनाबाबत | ७ |
| इतर | ९ |

### (८) शालेय व्यवस्थापनाकडूनही दुर्लक्षित

अडीअडचणींचा डोंगर पार करीत जे शिक्षक विद्यादानाचे कार्य नेटाने पार पाडीत असतात त्यांच्या प्रयत्नांना अनेकदा शाळेच्या व्यवस्थापनाकडून पाठिंबा मिळत नाही. 'शैक्षणिक साधन-सामग्री पुरविणे' एवढी साधी अडचणही दूर करण्यात येत नाही. कधीकधी व्यवस्थापनाकडून अडचणी सोडविल्या तर जात नाहीतच उलट शिक्षकांना 'व्यवस्थापन' हाच एक स्वतंत्रपणे मानसिक त्रास ठरतो.

शिक्षकांनी केलेल्या चांगल्या कार्याला व्यवस्थापनाकडून पावती मिळतेच असेही नाही. शिकविण्याच्या पद्धतीकडे, दर्जाकडे व्यवस्थापनाचे लक्ष नसते. चांगल्या कामाची त्यांची अपेक्षा, 'कागदोपत्री नोंद असणे' इतपतच मर्यादित असते, असे मत काही शिक्षकांनी व्यक्त केले.

### (९) शिक्षक पालक व समाज

शाळा व समाज यांचा खरेतर अतिशय घनिष्ट संबंध असायला हवा. शाळांच्या सुधारणेला समाजाची म्हणजेच एका अर्थाने पालकांची व समाजसुधारणेला शाळांची मदत होऊ शकते. भारतात व परदेशातही अशा प्रकारच्या घटना घडल्या आहेत. यादृष्टीने शिक्षक-पालक संघ अतिशय महत्त्वाची भूमिका निभावू शकतात. भारतीय समाजात हळूहळू या संघांचे महत्त्व परत एकदा वाढत असल्याचे आढळते.

शिक्षण यशस्वी व्हायचे असेल तर सरकार, शाळा, शिक्षक व पालक (समाज) यांच्या एकत्रित प्रयत्नांची गरज आहे. अनेक शिक्षणतज्ज्ञांनी शाळा व समाज यांचा निकटचा संबंध प्रस्थापित केला जावा, शाळा या 'समुदाय केंद्र' बनाव्यात, असे म्हटले आहे.

शिक्षकांना सामाजिक पुनर्रचनेच्या कार्यक्रमात गोवण्याबाबत दोन प्रकारचे मतप्रवाह आहेत. एका गटाचे म्हणणे असे की अशा सामाजिक कार्याच्या व्यापामुळे शिक्षकांचे शिकविण्याकडे दुर्लक्ष होते, शिक्षणाचा दर्जा खालावतो. दुसऱ्या गटाचे म्हणणे असे की ग्रामीण विभागात सामाजिक सुधारणा करण्यात 'शाळा' व 'शिक्षक' फार महत्त्वाची भूमिका निभावू शकतात.

शिक्षकांनी त्यांच्या नित्याच्या शालेय कामकाजाकडे दर्लक्ष करून समाजसुधारणा, लोकप्रबोधन करावे असे कुणाचेच म्हणणे नाही. पण शाळेमार्फत, विद्यार्थ्यांमार्फत समाजाला काही प्रमाणात तरी 'वळण' लावण्याचे काम बारीक-सारीक घटनांवरूनही मोठ्या प्रमाणात होऊ शकते. यासंदर्भातही प्रोबने चौकशी केली.

राजस्थानातील ढोलपूर येथील खुर्द या छोट्या गावात शिक्षकांच्या चांगल्या कार्याचे, वर्तनाचे समाजाकडून कौतुक करण्यात आल्याचे प्रोब गटाला आढळले. पण अशा घटनांचे प्रमाण खूप नव्हते. काही ठिकाणी एकदम याविरुद्ध वातावरण असल्याचेही प्रोबला जाणवले. सर्वसाधारणपणे या चार राज्यात शाळा, पालक व समाज, या संबंधात एक प्रकारचे जडत्व किंवा निष्क्रीयता आहे असे प्रोबने म्हटले आहे. हा परस्परसंबंध वाढावा यासाठी गावागावात 'ग्राम शिक्षण समिती' स्थापन करण्याचा निर्णय काही वर्षांपूर्वी घेण्यात आला होता. त्यानुसार ७२ टक्के गावांमध्ये ही समिती स्थापन झाली असल्याचे प्रोबने म्हटले आहे. ५१ टक्के गावांमध्ये ही समिती थोड्याफार प्रमाणात कार्यान्वित असून ३८ टक्के गावांतील प्रमुख शिक्षकांनी ही समिती चांगले कार्य करू शकते, ती दोन्ही बाजूंना उपयुक्त ठरू शकते, असे म्हटले आहे.

प्रोबच्या सर्वेक्षणानुसार पालक-शिक्षक संघ असणाऱ्या शाळांची संख्या एक पंचमांश होती. अनेक शाळांमध्ये पालक-शिक्षक संघांची स्थापनाही झाली नव्हती. 'ग्राम शिक्षण समिती' आणि 'पालक-शिक्षक संघ' यांच्या बरोबरच ग्रामपंचायत सुद्धा शाळा-शिक्षक-पालक यांच्यामधील दुवा ठरु शकते, असे प्रोबमध्ये म्हणण्यात आले आहे. अर्थात ग्रामपंचायतीचा कारभार हा मुळातच एक वेगळा मुद्दा आहे, त्यामुळे आत्ता त्या विषयाच्या खोलात न जाणेच योग्य ठरेल.

शाळांचा, शिक्षकांचा व पालकांचा समन्वय साधून शैक्षणिक प्रगतीचे उद्दिष्ट पूर्ण करणे हे काम सरकार, स्वयंसेवी संस्था, शाळा, जागरूक पालक-नागरिक अशा सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांनीच साध्य होऊ शकेल असे मत प्रोब गटाने व्यक्त केले आहे.

■■

*भूगोल शिकविताना तर वाघ, सिंह कुठे आढळतात? अशाच थाटात आदिवासी कुठे आढळतात? असा प्रश्न विचारला गेल्याचे प्रोब गटाला आढळले.*

# सुधारणेच्या दिशेने

प्राथमिक शिक्षणाबाबतच्या अनेक बाजूंचा विचार केल्यावर आपल्या मनात स्वाभाविकपणे प्रश्न उमटत जातात हे खरे तर प्रोबचे यशच म्हणायला हवे. या प्रश्नांसंदर्भातील महत्त्वाचा घटक म्हणजे केंद्र व राज्य सरकार. भारतीय घटनेच्या ४५ व्या कलमाप्रमाणे सर्व राज्यसरकारांनी स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दहा वर्षात १४ वयापर्यंतच्या मुलांना शिक्षण द्यावे असे अभिप्रेत आहे. आज स्वातंत्र्याला ५० वर्षे पूर्ण होत असतानाही प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न सुटला का नाही? सरकारने नेमक्या कोणत्या योजना आखल्या? त्यांना प्रतिसाद मिळाला की नाही? या व इतर संबंधित प्रश्नांच्या उत्तरासाठी देशाच्या प्राथमिक शिक्षणाच्या इतिहासात (अर्थातच स्वातंत्र्यानंतरच्या) डोकावून काही मुद्दे थोडक्यात लक्षात घ्यावे लागतील.

पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाली तेव्हा भारतामध्ये प्राथमिक शाळेत जाणाऱ्या ६ ते ११ वयाच्या मुलांपैकी फक्त ४२.६ टक्के मुले व ११ ते १४ वयोगटातील फक्त १२.७ टक्के मुले शाळेत दाखल झाली होती. येथे गळतीच्या प्रमाणाचा विचार केलेला नाही. आज आठवी पंचवार्षिक योजना (१९९२ ते १९९७) संपली असताना भारतातील याच वयोगटातील ग्रामीण भागातील ६३.३ टक्के मुले व मुली आणि शहरी भागातील ८२.४ टक्के मुले व मुली शाळेत दाखल झाली आहेत.

आपल्या देशामध्ये शिक्षणावर होणारा खर्च हा इतर देशांच्या मानाने कसा कमी आहे हे पाहता येईल. कोठारी आयोगाने राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ टक्के खर्च शिक्षणाच्या विकासावर करावा अशी शिफारस केली होती. १९६८ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातही ही शिफारस मान्य करण्यात आली होती. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, आठव्या पंचवार्षिक योजनेपासून शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ टक्क्यांपेक्षाही वाढत राहील, परंतु प्रत्यक्षात तसे घडले नाही. सध्या राष्ट्रीय पातळीवर एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या केवळ ४ टक्के एवढाच खर्च शिक्षणावर होतो. महाराष्ट्र राज्यात हे प्रमाण केवळ ३.१५ टक्के एवढेच आहे.

प्राथमिक शिक्षण हे शैक्षणिक पिरॅमिडचा पाया असल्याने तो अधिकाधिक विस्तृत आणि बळकट असण्याची गरज आहे. त्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक गुंतवणूक करणे आवश्यक आहे. परंतु गेल्या सात पंचवार्षिक योजनांमध्ये प्राथमिक शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण कमीच होत गेल्याचे दिसून येते.

प्राथमिक शिक्षणावर जी रक्कम खर्च केली जाते, त्यापैकी सुमारे ९४ टक्के रक्कम केवळ शिक्षकांच्या पगारावरच खर्च होते. वर्गखोल्यांचे बांधकाम व दुरुस्ती, फर्निचर, शैक्षणिक साहित्य इत्यादि बाबींसाठी आर्थिक तरतुद जवळजवळ नसल्यासारखीच अवस्था असते. ही परिस्थिती बदलून प्राथमिक शिक्षणासाठी फार मोठ्या प्रमाणावर भांडवली गुंतवणूक करण्याची गरज आहे.

यासंदर्भात जास्त खोलात न जाता आपण एवढेच म्हणू शकतो. प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात भारतात बरीच वर्षे फारसा चांगला बदल झालेला आढळत नाही. १९९० च्या दशकात मात्र सरकारने काही नव्या योजना राबविण्याचा प्रयत्न केला. प्रोबने त्याचा ऊहापोह केला आहे.

## (१) शाळेतील विद्यार्थ्यांना पोषक आहार

भारताच्या पंतप्रधानांनी १५ ऑगस्ट १९९५ रोजी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पोषक आहार ही योजना राष्ट्रीय पातळीवर जाहीर केली. १९९६ च्या अखेरीस प्रोबने केलेल्या सर्वेक्षणात त्यांना याबाबत खालील मुद्दे आढळले.

अ) पोषक आहार देण्याच्या योजनेमुळे पालकांचा पाल्यांना शाळेत पाठविण्याचा कल वाढला. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाली असे दर्शविणारे कागदोपत्री पुरावे प्रोबला मिळू शकले नाहीत तरी शिक्षकांशी व पालकांशी झालेल्या चर्चेतून वरील विधानाला पुष्टी मिळाली. शिक्षणाबरोबरच मुलांचे पोटही भरते ही बाब पालकांना सुखावणारी ठरली.

आ) विद्यार्थीही खूष - शाळेत गेल्यावर केवळ पुस्तकांशीच संबंध येत नाही तर आपल्या जेवण्याचीही काळजी घेतली जाते हे लक्षात आल्यावर विद्यार्थ्यांनाही शाळेत यावेसे वाटू लागले. शाळेत जाणाऱ्या कंटाळा करणाऱ्या मुलांचे पालकही 'शाळेत गेलास तर जेवण मिळेल' असे सांगून त्यांना शाळेत पाठवू लागले.

इ) पोषक आहारामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य सुधारले - सरकारी शाळांमधून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत त्यांचे पालक जागरूक असतातच असे नाही. गरीबीमुळे अनेकदा ही मुले अर्धपोटीच शाळेत येतात. पोट रिकामे असताना शाळेत कितीही उत्तम रीतीने शिकविले तरी ते त्यांना

*विपरित परिस्थितीतही जिद्दीने, नेटाने शालेय शिक्षण पूर्ण करणारे विद्यार्थी व तसे करायला लावणारे पालकही आढळतात पण अशांची संख्या फारच थोडी आहे.*

समजेलच असे नाही. पोषक आहार पुरविण्याच्या योजनेमुळे या मुलांचे आरोग्य तर सुधारू शकतेच शिवाय त्यांच्या आकलनशक्तीवरही त्याचा चांगला परिणाम होऊ शकतो असे प्रोब गटाला आढळले. अर्थात हा 'पोषक आहार' नेमका किती 'पोषक' असतो हा भाग वेगळा पण या मुलांचे आरोग्य बशीभर खिचडीनेही थोडेफार सुधारु शकते ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे.

सरकारतर्फे ही योजना राबविण्याची घोषणा करण्यात आली तरी प्रत्येक शाळेपर्यंत योजना पोहचून त्याची अंमलबजावणी होते की नाही? विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळतो की नाही? हे पाहणे महत्त्वाचे आहे. याबाबतीत प्रोबला असे आढळले की ६४ टक्के सरकारी शाळांमध्ये आहाराबाबतची योजना राबविली जाते, पण अनेक ठिकाणी तयार अन्न न देता अन्नधान्याचे वाटप (म्हणजे तांदूळ, डाळ, गहू इ.) करण्यात येते. ३६ टक्के शाळांमध्ये ही योजना राबविली गेली नसल्याचे प्रोबने म्हटले आहे. प्रत्येक मुलाला दरमहा ३ किलो या प्रमाणात हे वाटप होते. मोफत आहाराऐवजी अन्नधान्याचे वाटप ही योजना राबविण्यात येत असल्याने अशा शाळांमध्ये विद्यार्थ्यांची नोंदणी जास्त प्रमाणात होते; मात्र त्यांची नियमित उपस्थिती नसते, असे प्रोबला आढळले. तसेच या योजनेतून विद्यार्थ्यांना पोषक आहार मिळत नाही. अन्नधान्य संपूर्ण कुटुंबासाठी वापरले जाते असे लक्षात येते. याशिवाय अन्नधान्य वाटपात होणारा गैरव्यवहार, सरकारकडून अन्नधान्य मिळून ते वाटेपर्यंत होणारा विलंब यासारख्या बाबी लक्षात घेत या योजनेचा फायदा फारसा झाला असे म्हणता येत नाही.

अनेक ठिकाणी शिक्षकांचा वेळ या कामी जास्त प्रमाणात खर्च होतो आणि शिकविण्याकडे दुर्लक्ष होते असेही आढळले. विद्यार्थी व पालकांचेही शिक्षणापेक्षा मिळणाऱ्या अन्नधान्यावरच लक्ष असते असेही जाणवते. बिहारमध्ये तर ही योजना बंदच करण्यात आल्याचे प्रोबने नमूद केले आहे.

पोषक आहार योजना योग्य रीतीने राबविण्यासाठी जे व्यवस्थापन लागते ते या राज्यांमध्ये आत्ता तरी नाही त्यामुळे ही योजना कागदोपत्री चांगली असली तरी प्रत्यक्षात त्याचा फारसा उपयोग झालेला नाही ही वस्तुस्थिती आहे. केरळ, तामिळनाडू या राज्यात मात्र हा प्रयोग यशस्वी झाला आहे.

### (२) शिक्षाकर्मी

शिक्षकांची संख्या अपुरी असल्याने जिथे शिकविण्याच्या कामात खंड पडतो अशा शाळांसाठी शिक्षाकर्मी ही योजना आखण्यात आली आहे. शिक्षकांना

नेहमी जेवढा पगार देण्यात येतो त्याच्या अर्धा पगार या शिक्षकर्मींना देण्यात येतो. त्यांची दहा वर्षाची अशी नोकरी झाली की त्यांना सरकारी शाळांमधील नोकरीत 'शिक्षक' म्हणून सामावून घेण्यात येते. राजस्थानात ही योजना प्रथम कार्यान्वित झाली.

शिक्षाकर्मींची शैक्षणिक पात्रता बेताचीच असली व त्यांना मिळणारा पगार तुटपुंजा असला तरी ते विद्यार्थ्यांवर मेहनत घेऊन शिकवितात, असे प्रोबला आढळले आहे. अनेक पालकांनी प्रोब गटाला सांगितले की नोकरीत कायम झाल्यामुळे बरेचदा शिक्षकांमध्ये शिथिलता येते. तसे शिक्षाकर्मींचे होत नाही. तसेच जे शिक्षाकर्मी त्या त्या खेड्यातून, ग्रामीण भागातून नियुक्त केले गेले तर त्या समाजाचे नेमके प्रश्न, अडचणी शिक्षाकर्मींना माहिती असतात, ते आपल्या समाजाला जबाबदार असतात, त्यामुळे त्यांना जबाबदारीची जाणीव असते, तसेच त्यांना समाजाकडून मान्यताही मिळते असे प्रोबला आढळले. शिक्षाकर्मी ही योजना उपयोगी वाटत असली तरी सर्वकष विचार करून त्याचे फायदे-तोटे लक्षात घेऊन ती राबविण्याची गरज आहे असे प्रोबने म्हटले आहे.

**(३) पर्यायी शाळा**

ज्या मुलांना काही ना काही कारणामुळे शाळेपर्यंत पोहचता येत नाही अशा मुलांपर्यंत शाळेने पोहचणे, असे पर्यायी शाळेच्या योजनेबाबत म्हणता येईल. 'पर्यायी शाळा' आणि 'अनौपचारिक शिक्षण' या दोन बाबी भिन्न आहेत तथापि प्रोबने अनौपचारिक शिक्षणाचा विचार प्राधान्याने केला आहे. अनौपचारिक शिक्षणात शिक्षणपद्धतीचा नव्याने व वेगळ्या प्रकारे विचार करण्यात येतो. अनौपचारिक शिक्षण व सध्याचे शिक्षण याची तुलना, फायदे-तोटे व त्यातून निवडक गोष्टी घेऊन एक नवीन शिक्षण पद्धती राबविणे हा एक वेगळ्या चर्चेचा भाग आहे. पर्यायी शाळा व अनौपचारिक शिक्षण हे म्हटले तर वेगवेगळे आहे, पण पर्यायी शाळांपेक्षा अनौपचारिक शिक्षणावरच भर दिला तर चालू शकेल का? हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. केंद्र सरकारने अनौपचारिक शिक्षणाची योजना राबविली. त्याबाबत प्रोबगटाने अभ्यास केला. प्रोबने म्हटले आहे की केंद्रसरकारने देशात सुमारे २.४ लाख केंद्रांचे जाळे उभे केले. पण यातील बहुतांश केंद्रे बंद असल्याचे प्रोबला आढळले. जी केंद्रे सुरू होती तिथे शिकविण्याचा कार्यक्रम केवळ कसातरी उरकला जात होता. एकंदरीत शैक्षणिक

> *आपल्या मुलामुलींना शिक्षण मिळणे महत्त्वाचे आहे असे बहुतांश ग्रामीण पालकांना वाटते.*

पातळी फारच कमी प्रतीची होती. अशा केंद्रांमधून पदवीपर्यंत पोचलेला एकही विद्यार्थी प्रोबला आढळला नाही. या केंद्रांची संख्या ३.५ लाखावर पोचली असली ही योजना अतिशय अयशस्वी ठरली आहे. ही केंद्रे म्हणजे 'नफा देणारा एक उद्योग आहे' अशी प्रतिक्रिया एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने व्यक्त केली. म्हणजे यात नेमके काय व कसे शिकविले जात असेल ते वाचकांच्या लक्षात येईल.

औपचारिक शिक्षण व्यवस्थेत, शाळेसंदर्भात, अभ्यासक्रमाबाबत, पालकांसंदर्भात व इतर प्रशासकीय बाबीसंबंधी ज्या ज्या अडचणी आहेत त्या सर्वच अडचणी अनौपचारिक शिक्षण केंद्रात असल्याने या केंद्रांचा उपक्रम यशस्वी होईलच कसा? असा प्रश्न प्रोबने उपस्थित केला आहे. अर्थात अनौपचारिक शिक्षण केंद्रांची योजना बंद करणे हा उपाय नव्हे. या केंद्रांच्या अडचणी दूर करून ती सक्षम होतील याची उपाययोजना करण्याची गरज आहे.

## (४) खाजगी शाळा

खाजगी शाळा म्हणजे शहरातील शाळा असा विचार मनात येणे स्वाभाविक आहे. पण ग्रामीण भागातही खाजगी शाळांचे लोण पसरत असल्याचे प्रोबला आढळले आहे. ज्या पालकांना आर्थिकदृष्ट्या खाजगी शाळेत मुलांना पाठविणे शक्य असते व जिथे सरकारी शाळांच्या तुलनेत खाजगी शाळा सर्वदृष्टींनी चांगल्या असतात तिथे खाजगी शाळांचा पर्याय सहजपणे स्वीकारला जातो असे प्रोबला लक्षात आले. याबाबत प्रोबने बराच अभ्यास / सर्वेक्षण केले आहे. येथे त्याचे सविस्तर विवेचन करण्यात आलेले नाही.

## (५) स्वयंसेवी संस्थांचे उपक्रम

प्राथमिक शिक्षण क्षेत्रात सरकारी योजना फारशा प्रभावी ठरत नसतानाच स्वयंसेवी संस्थांनी मात्र प्राथमिक शिक्षणासंदर्भात केलेले कार्य उल्लेखनीय व प्रशंसनीय आहे. मध्यप्रदेशातील 'एकलव्य', राजस्थानातील 'लोकजुंबिश' व आंध्रप्रदेशातील 'एम. व्ही. फाऊंडेशन' या तीन संस्थांच्या उपक्रमांचा ऊहापोह प्रोबने केला आहे. या उपक्रमांना मिळणारा प्रतिसाद चांगला आहे; व त्यांनी प्रश्नाच्या मूळाशी जाऊन कार्यक्रमाची रचना केली आहे असे प्रोबला आढळले. तथापि प्रोबने जेथे सर्वेक्षण केले त्या भागात स्वयंसेवी संस्थांतर्फे चालविण्यात येणाऱ्या शाळांची संख्या अत्यल्प होती असे प्रोबने नमूद केले आहे. स्वयंसेवी संस्थांच्या अशा उपक्रमांची माहिती देणारी बरीच साधन-सामग्री उपलब्ध असल्याने येथे त्याचा विस्ताराने विचार करण्याचे प्रयोजन नाही.

## (६) डी.पी.इ.पी. (District Primary Education Programme)

सरकारतर्फे नुकतीच ही योजना सर्व जिल्ह्यांमध्ये सुरू करण्यात आली आहे. पण प्रोब गटाने पाहणी केली तेव्हा त्याचे परिणाम त्यांना समजू शकले नाहीत.

## हिमाचलप्रदेशाचा आदर्श

राज्यसरकारने प्रयत्न केले तर शिक्षण, समाजातील सर्व स्तरापर्यंत कसं पोहचू शकतं याचं उत्तम उदाहरण हिमाचल प्रदेशातील राज्य सरकारने आपल्यापुढे ठेवले आहे. १९६१ च्या जनगणनेनुसार हिमाचल प्रदेशात फक्त २१ टक्के पुरुष व ९ टक्के महिला साक्षर होत्या १९९१ च्या जनगणनेनुसार १० ते १४ वयोगटातील ९४ टक्के मुले व ८६ टक्के मुली साक्षर आहेत. येथील १५ ते १९ वयोगटातील ९० टक्के मुलांनी व ७६ टक्के मुलींनी पाचवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे. याच वयोगटातील ६१ टक्के मुलांनी व ४७ टक्के मुलींनी आठवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे. प्रोबच्या पाहणीनुसार १९९६ मध्ये हिमाचल प्रदेशातील ६ ते १४ वयोगटातील ९७ टक्के मुलांचे व ९५ टक्के मुलींची शाळेत नाव नोंदणी झाली असून येथे गळतीचे प्रमाण मुलांचे २ टक्के व मुलींचे ३ टक्के आहे. येथे खाजगी शाळांचे प्रमाण इतर राज्यांच्या तुलनेने अत्यल्प आहे हे महत्त्वाचे.

एकंदरीत पाहता असे जाणवते की केंद्र व राज्यसरकारांनी ज्या काही योजना आखल्या त्याचे व्यवस्थापन नीट झालेले नाही तसेच 'सरकारी योजना' असेच त्याचे स्वरूप राहिले. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व्हावे ही तळमळ या योजनांमधून पुढे आली नाही.

■■

*परिस्थिती हळूहळू बदलत आहे. मुली शिकल्या तर त्यांना संसार नीट करता येईल, मुलांची आजारपणे, शाळा-अभ्यास हे त्यांना योग्य रीतीने समजू शकेल, गरज पडल्यास त्या नोकरी करू शकतात असे विचार आता समाजमान्य होत आहेत.*

# सरतेशेवटी . . .

प्राथमिक शिक्षणाबाबत एवढी चर्चा केल्यानंतर असे वाटते की सरकारने व राजकीय पक्षांनी इतर क्षेत्रांना उदा. औद्योगिक विकास, हरितक्रांती, अण्वस्त्रसज्जता अशासारख्या बाबींसाठी जेवढे प्राधान्य दिले, तेवढाच अग्रक्रम नागरिकांपर्यंत शिक्षण पोहचविण्यासाठी का दिला नाही? याचे एक उत्तर म्हणजे शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाला अनेक राजकीय नेत्यांचा विरोध आहे. हा विरोध राजकीय स्वार्थापोटीच आहे. नागरिक सुशिक्षित, सुजाण व जागरूक व्हायला लागले तर नेत्यांना सत्तेच्या पायऱ्या चढणे अवघड होईल.

दुसरे उत्तर असे की, समजा, शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाला त्यांचा विरोध नसेल तर त्यांना त्यातून काही राजकीय फायदे पण मिळणार नसतील म्हणून त्यांनी शिक्षण क्षेत्राकडे द्यायला हवे तेवढे लक्ष दिले नाही. शाळेतील मुलांची संख्या वाढली याचे त्यांना राजकीय भांडवल करता येत नाही. खरे तर शिक्षण सर्वांपर्यंत पोचवून नागरिकांचा पाठिंबा राजकीय पक्षांना सहज मिळू शकला असता (अजूनही मिळू शकेल). पण ही जोखीम पत्करण्यापेक्षा इतर मार्ग अवलंबिणे त्यांना सोपे वाटले असावे. कारणे कोणतीही असोत, राजकीय नेत्यांनी शिक्षणक्षेत्राकडे इतर क्षेत्रांच्या तुलनेत दुर्लक्षच केले, ही वस्तुस्थिती आहे.

घटनेप्रमाणे शिक्षणदेण्याची जबाबदारी राज्य सरकारांवर आहे अर्थात केन्द्र सरकारची या जबाबदारीतून सुटका नाहीच. तथापि हे काम प्राधान्याने राज्य सरकारांनी करावे असे गृहित आहे. राज्य सरकारांनी इतर मार्गांचा अवलंब केला? बहुतेक राज्यसरकारांनी खाजगी शाळा, अनौपचारिक शिक्षण, स्वयंसेवी संस्थांचे शिक्षणविषयक उपक्रम, शिक्षणविषयक विशेष मोहिमा अशांद्वारे शिक्षण सर्वांपर्यंत पोचत असेल तर पोचू द्यावे, अशी भूमिका घेतली. अर्थात यातील प्रत्येक घटकाच्या मर्यादा लक्षात घेतल्या तर शिक्षण सर्वत्र पोचविण्याचे कार्य (आर्थिक व प्रशासकीय यंत्रणेच्या दृष्टिकोणातून) सरकारच करु शकते हे सत्य आहे.

**जनआंदोलनाची गरज -**

अनेक अडचणींमधून मार्ग काढत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व्हावे, शिक्षणाचा 'मूलभूत हक्कात' समावेश व्हावा, असे वाटत असेल तर शिक्षणाच्या बाजूने एक प्रभावी 'राजकीय गट' (लॉबी) उभा राहायला हवा. जपान, इंडोनेशिया व इतर काही राष्ट्रांत शिक्षणाच्या बाजूने प्रभावी राजकीय गट उभे

राहिले होते, तेव्हा राजकीय पक्षांनी त्याकडे, राष्ट्रवादी चळवळ, वसाहतवादविरोधी आंदोलन, तर कधी समाज सुधारणेच्या दृष्टिकोणातून, बघितले होते. केरळमधील इझावा नेत्यांनाही शैक्षणिक हक्कासाठी झगडावे लागले होते. महाराष्ट्रातील समाज सुधारकांनी जाती-पातीच्या भिंती मोडण्यासाठी व शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व्हावे यासाठी लढा उभा केला होता.

नागरिकांना सुशिक्षित करणे ही सरकारची, राजकीय पक्षांची जबाबदारी आहे, असे म्हणून नागरिकांनीच यातून पळवाट काढायची हे देखील योग्य होणार नाही. लोकशाही राष्ट्रात आपल्या हक्कासाठी लोकांनीच संघटितरीत्या लढायचे असते. राजकीय पक्षांवर, सरकारांवर तसा दबाव निर्माण करणे, राजकारणात प्रभावी गट तयार करणे, नागरिकांच्या चळवळी उभ्या करणे असे प्रयत्न समाजातून व्हायला हवे. आपल्या देशातील वृत्तपत्रांसहीत सर्व प्रसारमाध्यमेही लोकांच्या हक्कांसाठी सरकारवर दबाब आणू शकतात, तेव्हा प्रसार माध्यमांतून यावर चर्चा करणे, विचार पोचविणे असे प्रयत्नही करण्यात यावे. भारताने अणुचाचणी केल्यानंतर सर्व प्रसार माध्यमांनी त्यावर चर्चा केली, उच्चपदस्थ राजकीय नेते परदेशी असावे की नसावे, यावर सर्वत्र चर्चा होते, आर्थिक-औद्योगिक विषयांचा सर्वत्र अभ्यास केला जातो पण भारतातील बहुसंख्यांपर्यंत शिक्षण का पोचत नाही? सुशिक्षित स्वयंपूर्ण समाज ही देशाची खरी गुंतवणूक असून आपले आर्थिक प्रश्न याच विषयाशी निगडित आहेत हा विषय मात्र दुर्लक्षितच राहतो. तेव्हा प्रसार माध्यमांनीही यासाठी मदत केली पाहिजे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. सामाजिक अन्याय दूर व्हावा, आर्थिक विषमता नष्ट व्हावी यासाठी शिक्षण अत्यावश्यक आहे. शिक्षण ही मानवाची मूलभूत गरज आहे तसाच तो मूलभूत हक्कही आहे त्यामुळे या मूलभूत हक्कासाठी जनसामान्यांचे वैचारिक आंदोलन व त्याद्वारे सर्व संबंधित घटकांवर दबाव हे गरजेचे आहे. हे शतक संपता-संपता तरी अशाप्रकारची कृती व्हावी कारण लाखो-करोडो बालकांचे आणि भारताचे भवितव्य यावर ठरणार आहे.

■■

*"आजूबाजूच्या गोष्टींबद्दल कुतुहल वाटणे, त्यामधून प्रश्न व त्यांचे उत्तर मिळविण्यासाठी औत्सुक्य असणे, तार्किकता, विचारशक्ती, आकलनशक्ती, स्मरणशक्ती वाढून उत्तर मिळविणे म्हणजे ज्ञान मिळणे किंवा शिक्षण मिळणे होय.*

# परिशिष्ट - १

## साक्षरता

महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या (१९९१ च्या जनगणनेनुंसार) ७.८९ कोटी आहे व साक्षरतेचे प्रमाण ६४.८७ टक्के आहे. राज्याचे साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा नेहमीच जास्त राहिले आहे. साक्षरता कार्यक्रमातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल राज्याला वेळोवेळी पारितोषिके मिळाली आहेत.

- ग्रामशिक्षण मोहिमेच्या यशाबद्दल युनेस्कोचे मोहंमद रझा पहलवी पारितोषिक (१९५९),
- स्त्री साक्षरतेच्या क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल केंद्र शासनाचे पारितोषिक (१९८२-८३ आणि १९८३-८४)
- साक्षरता कार्यक्रमाच्या क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल "नादे झा के कृपस्काया" हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार.

शिक्षण सर्वांपर्यंत पोचण्यासाठी राज्यशासनाने विद्यार्थ्यांना काही विशेष सवलती देऊन प्रोत्साहनपर योजना आखल्या आहेत. राज्यात नवीन प्राथमिक शाळा उघडण्याचे निकष किमान २०० लोकवस्ती आणि दीड किलोमीटर्स अंतर असे आहेत. हे निकष पूर्ण करणाऱ्या सर्व वाड्या-वस्त्यांमध्ये प्राथमिक शाळा उघडण्यात आल्या आहेत. अतिदुर्गम भागात हे निकष किमान १०० लोकवस्ती आणि १ किलोमीटर अंतर असे शिथिल करण्यात आले आहेत.

## गळती रोखण्यासाठी योजना

प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी आर्थिक अडचणींमुळे मध्येच शिक्षण सोडू नये यासाठी राज्यशासनाने खालील योजना सुरु केल्या.

(१) ग्रामविकास विभागामार्फत शालेय आहार योजना

(२) अनुसूचित जातीजमाती, भटक्या आणि विमुक्त जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत गणवेश व लेखन साहित्य.

(३) पहिली ते चौथी या इयत्तांमधील वर उल्लेखित जाती जमातींमधील दारिद्र्यरेषेखालील मुलींना 'उपस्थिती भत्ता'.

(४) पुस्तकपेढी

(५) मागासवर्गीय विद्यार्थिनींना विशेष शिष्यवृत्त्या.

(६) अल्पसंख्याकांना आपल्या मातृभाषेतून शिक्षण घेता यावे या दृष्टीने सवलती.

(७) काहीनाकाही कारणामुळे प्राथमिक शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलामुलींसाठी अनौपचारिक शिक्षण वर्ग सुरू करण्याची सरकारची योजना असून हे वर्ग स्वयंसेवी संस्थांनी चालविल्यास त्यांना १०० टक्के अनुदान मिळू शकेल असे ठरविण्यात आले आहे.

**नवा अभ्यासक्रम**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि यशपाल समिती यांच्या शिफारशीनुसार प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर किमान अध्ययन क्षमतेचा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या संकल्पनेत अभ्यासक्रमाचे ओझे कमी करून मनोरंजन आणि आनंददायी अध्यापन पद्धतींचा वापर करून क्षणताधिष्ठित शिक्षण देणे अभिप्रेत आहे. राज्यस्तरावर हाती घेण्यात आलेल्या या प्रकल्पात खालील गोष्टींचा समावेश आहे.

- इयत्ता १ ते ५ च्या स्तरावर भाषा, गणित आणि परिसर अभ्यास या विषयांसाठी किमान अध्ययन क्षमतांचे निर्धारण
- क्षमताधिष्ठित सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या साधनांची निर्मिती.
- किमान अध्ययन क्षमतांवर आधारित शिक्षक हस्तपुस्तिकांची निर्मिती.
- स्वयंअध्ययन साहित्याची निर्मिती.
- शिक्षक आणि शिक्षक प्रशिक्षकांचे क्षमताधिष्ठित अध्यापन व मूल्यमापन यांविषयी प्रशिक्षण इत्यादी.

**शैक्षणिक तंत्रज्ञान**

(अ) अध्ययन - अध्यापन प्रक्रिया प्रभावी आणि मनोरंजक होण्यामध्ये शैक्षणिक तंत्रज्ञान खूपच परिणामकारक ठरते. त्यादृष्टीने ग्रामीण भागातील दूरवरच्या शाळांपर्यंत शैक्षणिक तंत्रज्ञान पोचवावे अशी शिफारस राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात करण्यात आली आहे. शासनाने आतापर्यंत ३३,३६६ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना रेडिओ-कम-कॅसेट प्लेअर्स पुरविले आहेत.

(आ) ज्या शाळांना कॅसेट प्लेअर्स पुरविण्यात आले आहेत अशा प्रत्येक शाळेला दरवर्षी अभ्यासक्रमावर आधारित चार ध्वनिफितींचा संच पुरविण्यात यावा असा प्रयत्न शासनाकडून करण्यात येणार आहे.

**केंद्रीय प्राथमिक शाळा स्थापन करणे**

ज्या शाळांचा दर्जा चांगला असतो, शाळांमध्ये शिक्षकांच्या जबाबदाऱ्या निश्चित केलेल्या असतात, शैक्षणिक साहित्य तेथे वापरले जाते, विद्यार्थ्यांचे

मूल्यमापन योग्य रीतीने होते, अशी एखादी शाळा नेतृत्व स्वीकारून परिसरातील प्राथमिक शाळांना यांबाबत मार्गदर्शन करू शकेल, यादृष्टीने 'केंद्रीय प्राथमिक शाळां'ची योजना सुचविण्यात आली आहे.

**शिक्षक प्रशिक्षण**

प्राथमिक शिक्षकांचे प्रशिक्षण हा या सर्व योजनेत महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यामुळे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांची स्थापना, शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण, शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका, अध्यापक विद्यालयांची तपासणी असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

**ग्रामशिक्षण समित्या**

संबंधित गावातील बालशिक्षण, प्राथमिक शिक्षण, अनौपचारिक शिक्षण आणि साक्षरता कार्यक्रम या क्षेत्रांचे नियोजन, अंमलबजावणी व नियंत्रणाची जबाबदारी शासनाने ग्रामशिक्षण समित्यांकडे सोपविली आहे. १ फेब्रुवारी १९९० च्या या निर्णयामुळे प्राथमिक शाळा ही 'गावाची शाळा' होण्यास मदत होऊ शकेल.

■■

## तक्ता क्र. १

५ ते १४ या वयोगटातील शाळेत जाणाऱ्या मुला-मुलींची राज्यनिहाय टक्केवारी (१९९३-१९९४)

| राज्ये | ग्रामीण भाग | | | शहरी भाग | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| आंध्र प्रदेश | ६८.० | ५०.८ | ५९.३ | ८५.४ | ८०.० | ८२.८ |
| आसाम | ७५.८ | ७२.६ | ७४.४ | ८२.० | ८०.७ | ८१.४ |
| **बिहार** | **५८.४** | **३८.६** | **४९.७** | **७६.१** | **७१.७** | **७४.१** |
| गुजरात | ७५.९ | ६०.६ | ६८.८ | ८६.७ | ८३.७ | ८५.२ |
| हरियाना | ८०.२ | ६६.० | ७३.५ | ८३.३ | ८६.६ | ८४.७ |
| हिमाचल प्रदेश | ९०.२ | ८२.० | ८६.० | ९१.९ | ९३.२ | ९२.५ |
| कर्नाटक | ७३.० | ६२.३ | ६७.८ | ८६.१ | ८४.० | ८५.० |
| केरळ | ९२.५ | ९३.९ | ९३.२ | ९५.५ | ९३.० | ९४.३ |
| **मध्य प्रदेश** | **६१.४** | **४४.२** | **५३.५** | **८७.०** | **८१.२** | **८४.३** |
| **महाराष्ट्र** | **८२.८** | **७३.०** | **७८.१** | **८९.१** | **८५.३** | **८७.३** |
| ओरिसा | ६६.९ | ५४.० | ६०.७ | ८०.७ | ७२.० | ७६.३ |
| पंजाब | ७९.६ | ७२.८ | ७६.५ | ८८.२ | ८७.१ | ८७.७ |
| **राजस्थान** | **६८.३** | **३१.४** | **५१.६** | **८१.८** | **६९.६** | **७६.२** |
| तामिळनाडू | ८२.६ | ७४.० | ७८.४ | ८७.६ | ८६.४ | ८७.० |
| **उत्तर प्रदेश** | **६६.७** | **४४.५** | **५६.८** | **७७.२** | **६८.१** | **७३.०** |
| पश्चिम बंगाल | ६८.९ | ६१.२ | ६५.२ | ८४.५ | ७६.३ | ८०.२ |
| **भारत** | **७०.३** | **५५.४** | **६३.३** | **८४.५** | **८०.०** | **८२.४** |

**संदर्भ : इंडिया डिव्हलपमेंट रिपोर्ट १९९९-२००० (पान क्र. ७०)**

**तक्ता क्र. २**


महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे इयत्तेप्रमाणे गळतीचे प्रमाण (१९९६-१९९७)
टक्केवारीने


| अनु. क्र. | इयत्ता | एकूण | मुले | मुली |
|---|---|---|---|---|
| १ | दुसरी | ९ | ९ | ९ |
| २ | तिसरी | १० | ११ | ९ |
| ३ | चौथी | १९ | १८ | १९ |
| ४ | पाचवी | २२ | २० | २५ |
| ५ | सहावी | ३१ | ३० | ३२ |
| ६ | सातवी | ३५ | ३२ | ३८ |
| ७ | आठवी | ४३ | ३९ | ४८ |
| ८ | नववी | ५१ | ४६ | ५७ |
| ९ | दहावी | ६० | ५६ | ६५ |

संदर्भ : महाराष्ट्र शासन : सिलेक्टेड एज्युकेशनल स्टॅटिस्टिक्स १९९६-९७

आलेख क्र. १

साक्षरतेचे प्रमाण - सामाजिक व प्रादेशिक असमतोल






साक्षरतेचे प्रमाण (१९९१ जनगणना) ७ वर्षावरील

संदर्भ - नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ अप्लाईड इकॉनॉमी (एन.आय.ए.ई) स्टॅस्टिटीकल डाटाबेस फॉर लिटरसी १९९१, व्हॉल्यूम २, नवी दिल्ली १९९३

# परिशिष्ट - २

अलिकडे युनिसेफने प्रकाशित केलेला 'शिक्षण : आनंदक्षण' हा रमेश पानसे यांचा ग्रंथ पाहावा.

# परिशिष्ट - ३

राज्यशासनाने नुकत्याच जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम (डिस्ट्रिक्ट प्रायमरी एज्युकेशन प्रोग्राम - डी पी ई पी) प्राथमिक शिक्षण समृद्धी कार्यक्रम (प्रायमरी एज्युकेशन एनहासमेंट प्रोजेक्ट - पी ई ई पी) आणि आमची शाळा कार्यक्रम (आशा) या नवीन योजना कार्यान्वित केल्या आहेत.

■■

# • निवेदन •

भारताच्या सध्याच्या आर्थिक, राजकीय, व सामाजिक परिस्थितीसंबंधीच्या विषयांच्या विविध पैलूंची माहिती व ज्ञान सर्वसाधारण वाचकाना करून देण्याच्या उद्देशाने भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने पुस्तिका प्रकाशनाचे काम हाती घेतले आहे. लोक शिक्षणासाठी केलेल्या या प्रयत्नामुळे सुजाण व विचारी समाज घडण्याला हातभार लागेल असा विश्वास वाटतो.

या मालिकेत पुढील पुस्तिका प्रकाशित करण्यात आल्या आहेत -

(१) भारतातील लोकसंख्या वाढीचा प्रश्न
*लेखिका - कुमुदिनी दांडेकर*

(२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण (इंग्रजी पुस्तिका)
*लेखक - जयकुमार अनगोळ*

प्रत्येक पुस्तिकेची किंमत ३०/- रुपये आहे. पण 'अर्थबोध पत्रिके'च्या सभासदाना ती २५/- रुपयांमध्ये देण्यात येईल. पुस्तिकेची किंमत चेक / ड्राफ्ट/ मनी ऑर्डर द्वारे पाठवावी. चेक / ड्राफ्ट 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' या नावाने काढला. पुण्याबाहेरील चेकमध्ये १५/- रुपयांची रक्कम वटणावळीचा खर्च म्हणून समाविष्ट करावी. मनी ऑर्डर करताना मजकुराच्या जागी आपले संपूर्ण नाव व पत्ता लिहावा.

**चौकशीसाठी पत्ता**

संचालक
भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी
'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट रोड,
पुणे - ४११ ०१६.

# वाचकांचा प्रतिसाद

स. न.

आपण स्मरणपूर्वक पाठविलेला 'नमुना अंक' मिळाला. धन्यवाद ! दळणवळणाची साधने जशी गतिमान होत आहेत, तसतसे अखिल विश्व छोटे होत आहे. दुसऱ्या अर्थाने नागरिकांच्या संबंधांची व्याप्ती वाढत आहे. व्यापार-उदिम व त्याच्या संदर्भात अर्थनीतीचाही तेवढ्याच झपाट्याने विस्तार होत आहे. धान्य देऊन गावातल्या गावात आवश्यक वस्तूंची देवाण-घेवाण करणारा एकेकाळचा गावकरी, आज विमानाने परदेशात आपल्या उत्पादित मालाचा व्यापार करून, परकीय चलनाची बेरीज-वजाबाकी करतो आहे. त्यामुळे परदेशातील बँकिंग व्यवस्थेशी संबंध आला. म्हणूनच अर्थनीतीचे स्वरूप आता पूर्वीप्रमाणे संकुचित राहिले नाही. आपण या पत्रिकेद्वारे बदलत्या अर्थकारणाचे स्वरूप, ताज्या घडामोडी, यांचे यथार्थ चित्रण कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

अविनाश देशपांडे
कार्यवाह, श्री. समर्थ वाचनालय
देगलूर, जि. नांदेड

स. न.

अर्थबोधपत्रिकेचा नमुना अंक मिळाला. आभारी आहे. आपल्या संस्थेच्या धोरणाशी सुसंगत असाच हा अंक आहे. आज भारतासारख्या देशात प्रकल्पग्रस्तांचे जीवन म्हणजे एक टांगती तलवार आहे. या पार्श्वभूमीवर 'विकास व विस्थापन : दीडशे वर्षापूर्वी अमेरिकेत' हा लेख उद्‌बोधक आहे. अमेरिकेची सर्व क्षेत्रांतील दादागिरी पाहता, डॉलरला पर्यायी चलन 'यूरो' संदर्भातील संकलन महत्त्वपूर्ण आहे. तसेच 'पाणी प्रश्न आणि लोकसहभाग' हा विषय चिंतनीय आहे. एकूणच नमुना अंकातील विषय ज्वलंत समस्यांवरील आहेत. सुबोध मांडणी हे या लेखांचे वैशिष्ट्य वाटले. हा अंक म्हणजे भविष्यातील एका दर्जेदार नियतकालिकाची नांदी होय.

जी. ए. बुवा
ग्रंथपाल
सावंतवाडी

स. न.

आदरणीय प्रा. वि. म. दांडेकर यांनी स्थापन केलेल्या संस्थेने 'अर्थबोधपत्रिके'च्या माध्यमाने सामान्यांसाठी ज्ञान, माहिती व संदर्भाचे दालन खुले केले आहे. आर्थिक, सामाजिक व राजकीय अशा सर्वव्यापी विषयांचे भांडार माझ्यासारख्या ग्रामीण भागातील जिज्ञासूला वरदान ठरणारे आहे. संकल्पना व सिद्धांत यांचा अभ्यास करता येईल.

चांदपाशा खैरोद्दिन शेख
पत्रकार व माजी नगराध्यक्ष
परंडा, जि. उस्मानाबाद

स. न.

अर्थबोधपत्रिका नमुना अंक पाठविल्याबद्दल धन्यवाद. अंकातील सारेच लेख उत्तम आहेत. विषयांच्या निवडीत विविधता आहे. भाषा सामान्य वाचकास समजेल अशी सोपी आहे. विषयांचा विस्तारही पुरेसा आहे. सामान्य वाचकाची जिज्ञासा पूर्ण करण्यास 'पत्रिका' समर्थ आहे.

पण, 'पाण्याचा प्रश्न...' हे शीर्षक लेखाचे मर्म समजण्यास परिपूर्ण आहे असे वाटत नाही. त्या प्रमाणात विषयाची व्याप्ती झालेली दिसत नाही. पिण्याच्या पाण्यासंदर्भात व शेतीला आवश्यक पाण्यासंदर्भात बरेच काही लिहिण्यासारखे आहे, असे वाटते. विशेषतः तलावांविषयी.

आणि या सर्व लेखांचे कर्ते कोण? पुढल्या अंकात लेखकाचे नाव देण्याची दक्षता घ्यावी. धन्यवाद !

डॉ. हरिश्चंद्र बोरकर
कार्यवाह, लक्ष्मणराव सार्वजनिक वाचनालय,
रेंगेपार (कोहळी), जि. भंडारा

स. न.

'अर्थबोधपत्रिका' विशेषतः आमच्यासारख्या ग्रामीण क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी खूपच उपयुक्त वाटली. कारण अशाप्रकारचे साहित्य वाचायला, आम्हा सर्वांनाच मिळत नाही. या पत्रिकेचे वैशिष्ट्य असे की भाषा सरळ, टाईप सुबक व कागद छान, शिवाय लेख आटोपशीर आहेत. फाफट पसारा नाही. लांबलचक लेख नसल्यामुळे वाचायला अधिकच सोयीचे.

धन्यवाद!

सुमन बंग
वर्धा

स. न.

अर्थबोधपत्रिकेचा नोव्हेंबर ९८ चा अंक उशिराने पाहायला मिळाला. विकास व विस्थापन, युरो चलन, मुक्त व्यापाराचे अमेरिकी तत्त्वज्ञान हे विषय फार सुलभपणे मांडले आहेत. भाषांतरात येणारी क्लिष्टता व अगमता काळजीपूर्वक टाळलेली आहे. त्यामुळे विषय सहजपणे जाणून घेता येतो.

प्रभात चौधरी,
पाल, जि. जळगाव.

स. न.

अर्थबोधपत्रिकेमधून जागतिक आर्थिक घडामोडींचा विकसनशील देशांवर काय परिणाम होतो हे थोडक्यात पण सुस्पष्टपणे सांगितले आहे. श्रीमंत राष्ट्रे गरीब राष्ट्रांचे शोषण कसे करतात, त्यांच्यावर अन्याय कसा करतात याचेही समर्पक वर्णन बऱ्याच लेखांतून आले आहे. आमच्या येथे लॅटिन अमेरिका, आफ्रिका, अफगाणिस्तान, बिहार, उत्तर प्रदेश या भागांतून येणाऱ्या प्रशिक्षणार्थींना या अर्थबोध पत्रिकेचा निश्चितच उपयोग होईल. (अर्थात मराठीचे भाषांतर करावे लागेल!) शिवाय खेड्यांतील आमच्या तरूण मंडळ, महिला मंडळ यांमधील लोकांनाही या माहितीचा उपयोग होईल.

शैला देशपांडे, प्रशासक
ग्रा. आ. प्रकल्प, जामखेड,

अर्थबोध पत्रिकेचे सन २००० या वर्षातील अंक
मिळण्यासाठी अर्ज

तारीख :

संपादक,
भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,
'अर्थबोध', ९६८/२१-२२,
सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६.

सस्नेह नमस्कार,

मला/आमच्या संस्थेला अर्थबोध पत्रिकेचे जानेवारी २००० ते डिसेंबर २००० या वर्षातील सर्व अंक हवे आहेत. त्यापैकी सहा अंकांचे देणगीमूल्य रूपये ५०/- (रु. पन्नास फक्त) डिमांड ड्राफ्टने / चेकने / मनीऑर्डरने / पोस्टल ऑर्डरने / रोख पाठविण्यात येत आहे. चेक / ड्राफ्टचा तपशील पुढील प्रमाणे :

---

---

(पुण्या बाहेरचा चेक असल्यास वटणावळीसाठी (कमिशनसाठी) पंधरा रुपये जादा पाठवावेत. चेक / ड्राफ्ट 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी, पुणे' या नावाने पाठवावेत.)

---

**टीप** - देणगीमूल्य व्यक्ती, संस्था, महाविद्यालये, सार्वजनिक वाचनालये या सर्वांसाठी एकच आहे.

अंक पाठविण्याचा पत्ता पुढीलप्रमाणे :

संबंधित व्यक्तीचे संपूर्ण नाव ____________________

____________________

संस्थेचे नाव ____________________

____________________

संस्थेशी असलेला संबंध ____________________

संपूर्ण पत्ता ____________________

____________________

____________________

गाव ____________________

तालुका व जिल्हा ____________________

पिन कोड ____________________

दूरध्वनी क्रमांक (एस टी डी कोडसह) ____________________

____________________

सही

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना :**

- इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी ही संस्था प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ कै. वि. म. दांडेकर यांच्या पुढाकाराने १९७० साली स्थापन करण्यात आली. या संस्थेचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

**उद्दिष्टे :**

- भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे;
- अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे;
- इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम :**

- संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी) चालवले जाते.
- संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.
- अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.
- नोव्हेंबर १९९८ पासून 'अर्थबोधपत्रिका' प्रकाशित केली जात आहे.

**- संस्थेचे मंडळ -**

स. वा. कोगेकर • कुमुदिनी दांडेकर • आनंद नाडकर्णी
नीळकंठ रथ • के. एन्. राज • सुनीती राव
दि. चं. वधवा • सु. म. विद्वांस • ए. वैद्यनाथन
सत्यरंजन साठे • रामदास होनावर

**प्रेषक :**

**भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी**
'अर्थबोध',
९६८/२१-२२, सेनापती बापट रोड,
पुणे ४११ ०१६.
फोन : ५६५७१३२ / ५६५७२१०
E-mail : ispe@vsnl.com